७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# कुंभमेळ्याच्या नियोजनाची कामे गतीने करा : मुख्यमंत्री

*नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर तीन द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना हुडकोकडून कर्ज घेण्यास मान्यता*

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोन अशा एकूण १८,१३०.५५ कोटी रुपयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली. नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गांच्या कामांच्या भूसंपादनासाठी लागणारे कर्ज हुडकोकडून घेण्यास तसेच नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी टप्पा २ मधील १०६३ कोटी रूपयांच्या कामांच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूरी दिली.

मंत्रालयात मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोनचा सुमारे ६९ लाख लोकांना फायदा होणार.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोन अशा एकूण १८,१३०.५५ कोटी रुपयांच्या कामांना मंजूरी देण्यात आली. या मार्गिकेची लांबी ३४.२१ किमी आहे, ज्यामध्ये १९ स्थानकांचा समावेश आहे. टप्पा १ कापूरबावडी ते धामणकर नाका, टप्पा २ धामणकर नाका ते दुर्गाडी, मार्गिका ५अ दुर्गाडी – कल्याण – उल्हासनगर या प्रकल्पामुळे ठाणे, भिवंडी, कल्याण आणि उल्हासनगर या भागातील सुमारे ६९ लाख लोकांना फायदा होणार असून प्रवास वेळेत ४०-५०% बचत होईल. या प्रकल्पासाठीच्या आवश्यक परवानगीसाठी केंद्र शासन व संबधित विभागाकडे गतीने कार्यवाही करावी.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन द्रुतगती महामार्ग या प्रकल्पांचे 'प्रकल्प कार्यान्वित करण्याचे वेळापत्रक' निश्चित करण्याच्या सुचना तसेच निविदा प्रसिद्धी, निविदा अंतिम करणे आणि प्रकल्प पूर्णतेचा कालावधी निश्चित करावा. या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून कर्ज उभारण्याच्या प्रस्तावावर वित्त विभागाशी समन्वय साधून तातडीने मार्ग काढावा. विदर्भातील दळणवळण आणि उद्योगांना चालना देण्यासाठी हे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे असल्याने सहा वर्षात हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करावी. नागपूर-गोंदिया द्रुतगती महामार्ग या महामार्गाची एकूण लांबी १६२.५७७ कि.मी. असून, प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत १९,५८२.१९ कोटी रुपये आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ३,१६२.१८ कोटी रुपयांच्या खर्चास, भंडारा-गडचिरोली द्रुतगती महामार्ग ९४.२४१ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ९३१.१५ कोटी रूपये, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्ग हा प्रकल्प २०४.७९९ कि.मी. लांबीचा असून याच्या भूसंपादनासाठी २,३५३.९४ कोटी रुपयांच्या प्रशासकीय खर्चाला मंजुरी देण्यात आली.

## खरातच्या व्यवहाराशी थेट संबंध नसल्याचा पत्नीचा दावा

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता न्यायालयात आज भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात महत्त्वाची सुनावणी पार पडली. आरोपी अशोक खरात यांची पत्नी कल्पना खरात हिच्या अटकपूर्व जामीन अर्जावर न्यायालयात दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद करण्यात आला. या सुनावणीत कल्पना खरात हिने आपल्या पतीच्या कथित गैरप्रकारांपासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. तिच्या वकिलांनी सादर केलेल्या मुद्द्यांमुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

कल्पना खरात ही 31 मार्चपासून फरार आहे. तिच्यावर पती अशोक खरात यांच्या कथित गैरकृत्यांमध्ये साथ दिल्याचा आरोप करण्यात आला होता. बँक व्यवहार आणि जमिनीच्या व्यवहारांमध्ये तिचा सहभाग असल्याचेही तपासात समोर आले होते. मात्र, न्यायालयात तिच्या वतीने मांडण्यात आलेल्या युक्तिवादात तिचा कोणत्याही व्यवहाराशी थेट संबंध नसल्याचा दावा करण्यात आला. तिची सर्व बँक खाती अशोक खरात हेच हाताळत होते, असे तिच्या वकिलांनी सांगितले.

आरोपीच्या वकिलांनी न्यायालयात अनेक मुद्दे मांडले. फिर्यादीने दीड वर्षांनंतर गुन्हा दाखल केल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. तसेच, जमीन व्यवहार झाल्यानंतरही फिर्यादीने बराच काळ न्यायालयीन दाद मागितली नाही, असेही त्यांनी नमूद केले. अशोक खरात यांच्यावर गुन्हे दाखल झाल्यानंतरच जुन्या व्यवहारांचा मुद्दा काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. तसेच, संबंधित बैठकींमध्ये कल्पना खरात उपस्थित नव्हती आणि व्यवहारांमध्ये तिचा सहभाग नव्हता, असा दावा करण्यात आला.

याउलट, सरकारी वकिलांनी या दाव्यांना जोरदार विरोध केला. कल्पना खरात हिच्या खात्यांमधून आर्थिक व्यवहार झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जमीन खरेदीच्या कागदपत्रांवर तिची सही आणि अंगठा असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले. तसेच, व्यवहारांसाठी तयार करण्यात आलेल्या मुखत्यारपत्रात व्याजदर निश्चित करण्याचा निर्णयही तिच्याच संमतीने घेतल्याचे सांगितले गेले. त्यामुळे ती या व्यवहारांपासून पूर्णपणे अनभिज्ञ होती.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




## नाशिक TCS कांड; आरोपींच्या वकिलांचा कोर्टात दावा

**नाशिक (दै. संध्या)**




नाशिक आयटी कंपनीतील कथित लैंगिक शोषणाच्या प्रकरणातील आरोपींच्या वकिलांनी कोर्टात एकत्र काम करताना झालेल्या वादातून आपल्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे अवघ्या राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणाला एक वेगळे वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नाशिक स्थित टीसीएस कंपनीत कार्यरत असणाऱ्या तरुणींवर लैंगिक अत्याचार झाल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. या प्रकरणी 9 तरुणींनी आपल्या वरिष्ठांविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी नोकरीचे आमिष दाखवून रिसॉर्टवर नेत अत्याचार केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणी धर्मांतराचा अँगलही समोर आला आहे. पोलिसांनी या प्रकरणी अटक केलेल्या आरोपींच्या जामिन अर्जावर आज नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी झाली. त्यात आरोपीच्या वकिलांनी या प्रकरणाला उगीचच वेगळे वळण दिले जात असल्याचा युक्तिवाद केला.

बचाव पक्षाचे वकील म्हणाले की, फिर्यादी व आरोपी एकाच कंपनीत काम करतात. काम करताना त्यांच्यात वाद झाला. त्या वादातून फिर्यादीने आरोपींवर खोटा गुन्हा दाखल केला. त्यांच्या या युक्तिवादावर सरकारी वकील किरण बेंडभर यांनी जोरदार विरोध करत आरोपींना जामिन देण्यास विरोध दर्शवला. आरोपींविरोधात बलात्कार व अॅट्रॉसिटी सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपीच्या कृत्याचे समाजात गंभीर पडसाद उमटलेत. त्यामुळे त्यांना जामीन देऊन दिलासा देण्याची काहीच गरज नाही, असे ते म्हणाले. अखेर कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपी दानिश शेख व इतरांचा जामीन अर्ज फेटाळला. दरम्यान, बचाव पक्षाच्या नव्या युक्तिवादानंतर प्रस्तुत प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## मालेगाव स्फोट प्रकरणात मोठा ट्विस्ट; चार आरोपींना दिलासा

**नाशिक (दै. संध्या)**



मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात मोठा घडामोडींचा टप्पा गाठत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. 2006 साली झालेल्या स्फोट प्रकरणातील चार आरोपींना न्यायालयाने मोठा दिलासा दिला असून, सत्र न्यायालयाने यांच्याविरोधात निश्चित केलेले आरोप रद्द केले आहेत. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेला खटला आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर आरोपींना दिलासा मिळाला असून, प्रकरणातील तपास आणि पुराव्यांवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या प्रकरणात राजेंद्र चौधरी, धान सिंह, लोकेश शर्मा आणि मनोहर नरवारीया या चार आरोपींचा समावेश होता. सत्र न्यायालयाने यांच्यावर हत्या, गुन्हेगारी कट रचणे तसेच युएपीए कायद्यांतर्गत आरोप निश्चित केले होते. मात्र, या आदेशाला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर सुनावणीदरम्यान न्यायालयाने सादर केलेल्या पुराव्यांचा आणि तपास प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला. अखेर पुरावे अपुरे असल्याचे नमूद करत सत्र न्यायालयाचा आदेशच रद्द करण्यात आला.

सुनावणीदरम्यान राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून एकही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सादर करण्यात आला नाही, ही बाब न्यायालयाच्या निर्णयात महत्त्वाची ठरली. घटनेचा प्रत्यक्ष अनुभव सांगणारा साक्षीदार नसल्यामुळे आरोपांची पायाभूत रचना कमकुवत ठरल्याचा मुद्दा आरोपींच्या वकिलांनी मांडला होता. तसेच, यापूर्वीच इतर आरोपींची सुटका झाल्याचा संदर्भ देत हा खटला टिकू शकत नाही, असा युक्तिवादही करण्यात आला. न्यायालयाने या सर्व बाबींचा विचार करत आरोपींना दिलासा दिला.

2006 मध्ये मालेगाव येथे चार ठिकाणी झालेल्या स्फोटांमध्ये 31 जणांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. या भीषण घटनेने संपूर्ण राज्य हादरले होते. या प्रकरणात दीर्घकाळ तपास सुरू राहिला आणि अनेक आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले. मात्र, कालांतराने पुराव्यांच्या अभावामुळे आणि तपासातील त्रुटींमुळे खटल्याची दिशा बदलत गेली. याच पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा ठरतो.

दरम्यान, 2008 साली झालेल्या मालेगाव स्फोट प्रकरणातही सर्व सात आरोपींची यापूर्वी निर्दोष सुटका झाली होती. त्या प्रकरणातही केवळ संशयाच्या आधारे आरोपींना दोषी ठरवता येत नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने त्यांची मुक्तता केली होती. आता 2006 च्या प्रकरणातही तसाच निर्णय आल्याने दोन्ही स्फोट प्रकरणांतील आरोपींना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे या संपूर्ण तपास प्रक्रियेवर आणि यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर चर्चा सुरू झाली आहे.

या निर्णयानंतर आरोपींनी न्यायालयाचे आभार मानले असून, आम्हाला उशिरा का होईना पण न्याय मिळाला, अशी प्रतिक्रिया दिली. 17 वर्षांनंतर या प्रकरणाचा निकाल लागल्याने संबंधित कुटुंबीय आणि समाजातही विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. या स्फोटांमध्ये अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले होते. त्यामुळे न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता पुढे काय घडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ब्रेकिंग न्यूज

## उघडले केदारनाथ धामचे कपाट

केदारनाथ (दै. संध्या) : चारधाम यात्रेच्या चौथ्या दिवशी, बुधवारी सकाळी 8 वाजता केदारनाथ धामचे दरवाजे विधिवत उघडण्यात आले आहेत. परंपरेनुसार, सर्वप्रथम मंदिराचा पूर्वेकडील दरवाजा उघडण्यात आला आणि मुख्य पुजारी, रावळ व हक-हकूकधारकांनी आत प्रवेश करून पूजा-अर्चा सुरू केली. यावेळी, गेल्या वर्षी दरवाजे बंद करताना ज्योतिर्लिंगावर लावलेला भस्म काढून भाविकांना प्रसाद म्हणून वाटण्यात आला. दरवाजे उघडण्याच्या प्रसंगी, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी धाममध्ये पोहोचून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावाने पहिली पूजा केली. वैदिक विधी-विधानानुसार पूजा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, मंदिराचे मुख्य दरवाजे आता सामान्य भाविकांसाठी उघडण्यात आले आहेत आणि दर्शन सुरू झाले आहे. यावेळी यात्रेत नियमांबाबत अधिक कठोरता दिसून येत आहे. मंदिर समितीने स्पष्ट केले आहे की, मंदिर परिसरातून 50 ते 60 मीटरच्या परिसरात कोणत्याही व्यक्तीला मोबाईल फोन घेऊन जाण्याची परवानगी नाही. याव्यतिरिक्त, फोटोग्राफीसाठी धाममध्ये स्वतंत्र निश्चित जागा तयार करण्यात आल्या आहेत, मोबाईल तिथेच वापरता येईल.

## मतांच्या 'चिकेन नेक'वर भाजप पकड मजबूत करणार का?

# मुस्लिमबहुल ६ जिल्ह्यांमध्ये आहेत ममतांचे प्राण

**उत्तर बंगाल (दै. संध्या)**




उत्तर बंगालमध्ये भाजपच्या जागा टीएमसीपेक्षा ६ ने जास्त आहेत

| जिल्हा | हिंदू लोकसंख्या | मुस्लिम लोकसंख्या | एकूण जागा | TMC+ | भाजपा+ |
|---|---|---|---|---|---|
| कूचबिहार | 74% | 25% | 9 | 2 | 7 |
| अलीपुरद्वार | 79% | 9% | 5 | 0 | 5 |
| जलपाईगुडी | 81% | 12% | 7 | 3 | 4 |
| कालिम्पॉन्ग | 60% | 3% | 1 | 1 | 0 |
| दार्जिलिंग | 74% | 6% | 5 | 0 | 5 |
| उत्तर दिनाजपूर | 49% | 50% | 9 | 7 | 2 |
| दक्षिण दिनाजपूर | 73% | 25% | 6 | 3 | 3 |
| मालदा | 48% | 51% | 12 | 8 | 4 |
| एकूण | 65% | 25% | 54 | 24 | 30 |

उत्तर बंगाल वेगळा करण्याची मागणी सर्वप्रथम जून २०२१ मध्ये पुढे आली होती, जेव्हा अलीपूरद्वारचे भाजप खासदार जॉन बारला यांनी म्हटले होते की, या जिल्ह्यांना एकत्र करून केंद्रशासित प्रदेश बनवण्यात यावा. ममतांनी तत्काळ विरोध केला. परंतु स्वतः भाजपचे प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष यांनी बारला यांच्यापासून हे सांगत स्वतःला दूर केले की, बंगालचे विभाजन करणे हा आमचा अजेंडा नाही.

तीन वर्षांनंतर जुलै 2024 मध्ये, गोड्डाचे भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत हीच मागणी मोठ्या प्रमाणावर मांडली. झारखंडमधील संथाल परगणातील 6 जिल्हे, बिहारमधील सीमांचलचे 4 जिल्हे आणि बंगालमधील मालदा, मुर्शिदाबादसह उत्तर बंगालचे काही भाग - या सर्वांना एकत्र करून केंद्रशासित प्रदेश (UT) बनवण्याची मागणी केली. यामागे तर्क असा होता की या भागांमध्ये मुस्लिम लोकसंख्या वेगाने वाढत आहे. पण संसदेत यावर चर्चा झाली नाही, ना भाजपने याला अधिकृत भूमिका बनवले.

आता 2026 मध्ये बंगाल निवडणुकीच्या अगदी आधी शाह यांच्या सीमांचल भेटीनंतर हीच चर्चा तिसऱ्यांदा समोर आली.

उत्तर बंगाल ताब्यात घेतल्याने भाजपला विशेष निवडणुकीचा फायदा नाही राजकीयदृष्ट्या हा भाग सध्या भाजपच्या बाजूने झुकलेला आहे. 2021 मध्ये या 8 जिल्ह्यांमधील 54 जागांपैकी भाजपने 30 आणि टीएमसीने 24 जागा जिंकल्या. 2016 मध्ये येथे डाव्या पक्षांनी 25 जागा जिंकल्या होत्या, परंतु 2021 पर्यंत त्यांची जागा भाजपने घेतली.

याचे कारण लोकसंख्याशास्त्र आहे. या 8 पैकी 6 जिल्ह्यांमध्ये हिंदू लोकसंख्या 73-81% च्या दरम्यान आहे. फक्त उत्तर दिनाजपूर आणि मालदामध्ये मुस्लिम लोकसंख्या 50% च्या जवळपास आहे आणि तिथे टीएमसी मजबूत आहे. म्हणजेच, उत्तर बंगालमध्ये भाजपची ताकद आणि टीएमसीची कमकुवतता या दोन्हीचे एकच कारण आहे - लोकसंख्याशास्त्र. पण हे अर्धे चित्र आहे. खरे चित्र दक्षिण बंगालमध्ये आहे.

पश्चिम बंगालमधील 23 जिल्ह्यांपैकी 6 मुस्लिमबहुल जिल्हे आहेत - मुर्शिदाबाद, मालदा, उत्तर दिनाजपूर, दक्षिण 24 परगणा, उत्तर 24 परगणा आणि बीरभूम. विधानसभेच्या 294 पैकी 118 जागा म्हणजेच 40% जागा याच जिल्ह्यांमध्ये आहेत.

2021 मध्ये टीएमसीने एकूण 215 जागा जिंकल्या होत्या - त्यापैकी 103 म्हणजेच 48% जागा याच 6 जिल्ह्यांमधून आल्या. या जिल्ह्यांमध्ये टीएमसीचा विजय दर 87% राहिला. भाजपला केवळ 14 जागा मिळाल्या.

## चैतन्य देगलूकर वारकरी संप्रदायातील घुसखोर

**मुंबई (दै. संध्या)**



वारकरी संप्रदाय व संत साहित्य सर्वकाही संपण्याची भीती दाखवून भाजपला मतदान करण्याचे आवाहन करणारे चैतन्य महाराज देगलूरकर हे वारकरी संप्रदायातील घुसखोर असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी केला आहे. देगलूरकर यांनी राम कृष्ण हरी हा मूलमंत्र पुसून जय श्रीराम हा राजकीय मंत्र रुजवला, असेही ते म्हणालेत.

शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी एका लेखाद्वारे वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारांच्या लोकांची घुसखोरी झाल्याचा आरोप केला होता. तेव्हापासून विकास लवांडे यांनी अशा लोकांची कथित पोलखोल करत आहेत. त्यांनी आज एक व्हिडिओ पोस्ट करत चैतन्य महाराज देगलूरकर हे वारकरी संप्रदायातील प्रतिगामी विचारांचे घुसखोर असल्याचा तिखट आरोप केला. वारकरी संप्रदाय व संत साहित्याला भाजपशिवाय कुणीही वाचवू शकणार नाही अशी काल्पनिक भीती दाखवून ते आपल्या रसाळ वाणीने जनतेचा बुद्धिभेद करत आहेत, असे ते म्हणालेत.

विकास लवांडे आपल्या पोस्टमध्ये जोडलेल्या व्हिडिओचा दाखला देत म्हणाले, हा घ्या आणखी एक पुरावा. हे आहेत देगलूरकर फडाचे शब्दप्रभू चैतन्य देगलूरकर आणि त्यांचे 2024 मधील पंढरपुरातील कीर्तनकारांच्या मेळाव्यातील भाषण. वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य सर्व काही संपणार आहे म्हणून भाजप शिवाय कुणीच आपल्याला वाचवणार नाही. अशी काल्पनिक भीती दाखवून निवडणुकीत प्रचार कसा करावा, जनतेचा बुद्धिभेद कसा करावा याचे आपल्या रसाळ वाणीने प्रशिक्षण देत आहेत. त्यानंतर राज्यात अनेक कीर्तनकार आपल्या कीर्तनातून भाजपाचा उघड खरा नव्हे खोटा प्रचार करत होते.

सामान्य जनतेचा बुद्धिभेद करत होते. भागवत वारकरी संप्रदायातील संतांच्या कोणत्या ग्रंथात आहेत ? राम कृष्ण हरी हा मूलमंत्र पुसून जय श्रीराम हा राजकीय नवा मंत्र रुजवणाऱ्या सन्माननीय देगलूरकर यांना वारकरी संप्रदायातील घुसखोर नाही म्हणायचे तर काय मग म्हणायचे ? त्यांच्या समर्थकांनी सांगावे. बाकी त्यांच्या देगलूरकर फडाचा पूर्व इतिहास, ते वर्णवर्चस्ववादी आहेत की नाही, त्यांची घराची परंपरा याच्याशी मला आत्ता काहीच बोलायचे नाही बोललो नाही. राम कृष्ण हरी, असे ते म्हणालेत.

## संपादकीय

# ओल्या जखमेची वर्षपूर्ती

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगामच्या निसर्गरम्य 'बैसारन व्हॅली'त झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश सुन्न झाला होता. २६ निष्पाप पर्यटकांचा बळी घेणाऱ्या या घटनेने माणुसकीला काळिमा फासला, पण त्याच वेळी भारताच्या अदम्य धैर्याची आणि लष्करी सामर्थ्याची नवी ओळख जगाला करून दिली. 'पहलगाम' शब्द उच्चारला, तरी तो भीषण दहशतवादी हल्ला डोळ्यांसमोर येतो. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. काश्मीरच्या सौंदर्याचे वर्णन करताना 'पृथ्वीवरील नंदनवन' हा शब्द नेहमीच वापरला जातो. मात्र, गेल्या वर्षी याच दिवशी नंदनवनातील पहलगामच्या निसर्गरम्य 'बैसारन व्हॅली'मध्ये रक्ताचे सडे पडले. हा दिवस केवळ त्या २६ निष्पाप जीवांच्या बलिदानाच्या स्मरणाचा नाही, तर दहशतवादाविरोधात भारत देश किती ठामपणे उभा आहे, याचं प्रत्यंतर दर्शवणारा आहे. बैसारन व्हॅलीमध्ये पर्यटक घोडेस्वारीचा आणि निसर्गाचा आनंद घेतात. त्यादिवशी दुपारी १ ते ३ च्या सुमारास अचानक ४ ते ७ सशस्त्र दहशतवादी जंगलातून बाहेर आले आणि त्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले बहुतांश पर्यटक होते. हल्ल्याच्या त्या भीषण क्षणांमध्ये केवळ मृत्यूचे तांडव नव्हते, तर माणुसकीची काही उदाहरणेही जगाला पाहायला मिळाली. आदिल हुसेन शाह नावाच्या एका स्थानिक खेचरस्वाराने पर्यटकांना वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घातला. या हल्ल्यात महाराष्ट्रातील दिलीप देसले आणि अतुल मोने यांच्यासह देशाच्या विविध भागांतील पर्यटकांना आपले प्राण गमवावे लागले. आपल्या कुटुंबासह सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गेलेले भारतीय नौदलाचे अधिकारी लेफ्टनंट विनय नरवाल हेदेखील या हल्ल्याचे बळी ठरले. हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. पाकिस्तान पुरस्कृत 'द रेसिस्टन्स फ्रंट' या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने केवळ निषेध व्यक्त करून थांबायचे नाही, अशी ठाम भूमिका घेतली. दहशतवाद्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्यासाठी भारतीय सशस्त्र दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. ७ मे २०२५ रोजी भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्त कारवाई करत पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर 'सर्जिकल स्ट्राईक' केला, ज्यात सुमारे १००हून अधिक दहशतवादी मारले गेले. जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा यांसारख्या संघटनांची महत्त्वाची केंद्र उद्ध्वस्त करण्यात लष्कराला यश मिळाले. ही मोहीम केवळ २३ मिनिटांत यशस्वीपणे पूर्ण झाली, ज्यामध्ये 'राफेल' विमानांचा वापर करण्यात आला होता. त्याव्यतिरिक्त भारताने पहिल्यांदाच १९६० चा ऐतिहासिक सिंधू जल करार स्थगित करण्याचा मोठा निर्णय घेतला. जोपर्यंत पाकिस्तान सीमेपलीकडील दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही, तोपर्यंत हा करार व्यवहारात राहणार नाही, अशी स्पष्ट भूमिका भारत सरकारने घेतली. पाकिस्तानशी व्यापार पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतल्याने आधीच आर्थिक संकटात असलेल्या पाकिस्तानचं कंबरडे मोडलं. या हल्ल्यानंतर काश्मीरमधील पर्यटकांच्या सुरक्षेसाठी अनेक मोठे बदल करण्यात आले. क्यूआर कोड आणि डिजिटल ट्रॅकिंगची पद्धत अवलंबली गेली. पर्यटकांच्या प्रत्येक वाहनाला आणि घोडेस्वारांना विशेष क्यूआर कोड दिले जाऊ लागले. त्यामुळे कोणता पर्यटक कोणत्या भागात आहे, याची अचूक माहिती नियंत्रण कक्षाला मिळू लागली. पहलगाम आणि बैसारन व्हॅलीसारख्या दऱ्याखोऱ्यांतील घनदाट जंगलांच्या भागात २४ तास उच्च-गुणवत्तेच्या ड्रोनद्वारे गस्त घातली जात आहे. जंगलात कोणत्याही संशयास्पद हालचाली दिसल्यास तत्काळ अलर्ट दिला जातो. स्थानिक लोकांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी गावकऱ्यांना संरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आलं आहे.

दहशतवाद्यांना स्थानिक स्तरावर कोणताही आधार मिळणं आता कठीण होत आहे. लष्कर आणि स्थानिक पोलीस यांच्यात समन्वय वाढवण्यासाठी विशेष 'क्विक रिस्पॉन्स टीम्स' तैनात करण्यात आल्या आहेत, ज्या ५ मिनिटांच्या आत कोणत्याही घटनास्थळी पोहोचू शकतात.

## संस्कृत सुभाषित

आपदाम् अपहर्तारं, दातारं सर्वसंपदाम्

अर्थ – म्हणजे – आपदा – विपत्तीचे हरण करणारा व सर्व संपदा देणारा – असा राम हा अर्थ अधिक चांगला कळतो.

## गुरु वचन

### प्रेम स्वातंत्र्याची किंमत नव्हे! : ओशो

आम्हाला सर्व हवे आहे पण आम्हाला प्रेम स्वातंत्र्याच्या किमतीवर नकोय. आपल्याला दोन्ही कसे मिळू शकते? मला माझे स्वातंत्र्य हवे आहे. मी माझ्या प्रेयसीला स्वातंत्र्य देतो पण मला तिचे लक्ष ठेवण्याच्या रुपात दु:ख मिळते. प्रेयसीला स्वातंत्र्य देण्याचा तुमचा विचारच चुकीचा आहे. प्रेयसीला स्वातंत्र्य देणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही प्रेम करू शकतात व तुमच्या प्रेमात स्वातंत्र्य आहे. ही गोष्ट दुसऱ्याला देण्यासारखी नाही. जर देण्यास आली तर तिच अडचण येईल जिचा तुम्ही सामना करत आहात.

खरंतर तुम्ही स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. तुम्हाला वाटेल की, स्वातंत्र्य देण्यासारखी परिस्थितीच निर्माण होऊ नये पण तुम्ही अनेकदा मला प्रेम स्वातंत्र्य देते, हे सांगताना ऐकले असेल म्हणून स्वातंत्र्य देण्यासाठी स्वत:वर दबाव टाकतात कारण तुमचे प्रेम, प्रेम नसते.

तुम्हाला एका अवघड प्रश्नात अडकले आहात. जर तुम्ही स्वातंत्र्य दिले नसते तर तुम्हाला प्रेमावर संशय आला असता. जर तुम्ही इच्छा नसूनही स्वातंत्र्य दिले तर हजार प्रश्न निर्माण होतात. तुम्ही तुमच्या प्रेयसीसाठी पुरेसे नाहीत? की तिला दुसऱ्याची साथ हवी म्हणून तिला स्वातंत्र्य हवे आहे? यामुळे दु:ख होते व तुम्ही विचार करतात की, तुम्ही आपल्यापेक्षा कमी महत्व देतात.

तिला स्वातंत्र्य देऊन तुम्ही इतरास पहिले ठेवले व नंतर स्वत:ला. हे अंहकाराविरुद्ध आहे व यामुळे काही फायदा होणार नाही कारण तुम्ही जे स्वातंत्र्य दिले आहे त्यासाठी तुम्ही बदलणार.

दुसरी गोष्ट म्हणजे जर तुमची प्रेयसी दुसऱ्यासोबत राहिली असेल तर तुम्हाला आपल्या प्रेयसीसोबत राहणे वेगळे वाटेल. यामुळे तुमच्या व तिच्यात अडथळा निर्माण होईल. तिने दुसऱ्याची निवड केली आहे व तुम्हाला सोडून दिले आहे किंवा तिने तुमचा अपमान केला आहे.

व तुम्ही तिला खुप काही दिले आहे, तुम्ही उदार होत आहोत, तुम्ही तिला स्वातंत्र्य दिले आहे. तुम्हाला दुखावल्यासारखे जाणवत आहे म्हणून तुम्ही तिला कुठल्यातरी रुपात दुखवाल.

पण हे सर्व गैरसमजामुळे होते. मी हे म्हणालो नाही की, तुम्ही प्रेम करत असाल तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागेल. नाही मी म्हणालो आहे की, प्रेम स्वातंत्र्य आहे. येथे प्रश्न देण्याचा नाही. जे जसे आहे त्याला तसेच राहू द्या. विनाकारण गुंतागूंत का वाढवायची? अगोदरच अनेक अडचणी आहेत.

जर तुमचे प्रेम त्या पातळीपर्यंत आले आहे की, स्वातंत्र्य तिचे अंग बनले आहे तेव्हा तुमच्या प्रेयसीला परवानगी घेण्याची गरजच राहणार नाही. जर मी तुमच्या जागी असतो व माझ्या प्रेयसीने परवागनी मागितली तर मला दु:ख झाले असते. याचा अर्थ तिला म इया प्रेमावर विश्वास नाही. माझे प्रेम स्वातंत्र्य आहे. मी तिच्यावर प्रेम केले आहे याचा अर्थ असा नव्हे की, मी सर्व मुभा दिली ज्यामुळे ती कुणासोबतही हसू शकेल, कुणासोबतही नृत्य करु शकेल, कुणावर प्रेम करु शकणार नाही कारण आपण कोण आहोत?

आपण कोण आहोत? हा मुळ प्रश्न आहे, जो सर्वांनी केला पाहिजे. आपण सर्व अनोळखी आहोत व या आधारावर आपण सांगू शकतो की, मी तुला स्वातंत्र्य देईल किंवा मी तुला स्वातंत्र्य देणार नाही. जर तु माझ्यावर प्रेम करत असेल तर दुसऱ्यावर प्रेम करू शकत नाही? या सर्व मूर्ख गोष्टी आहे पण या सर्व मानवावर सुरुवातीपासून हावी राहिल्या आहेत व आपण अजूनही असभ्य आहोत. प्रेम काय असते? हे आपणास अजूनही माहित नाही.

जर मी कुणावर प्रेम करत असेल तर मी त्या व्यक्तीप्रती कृतज्ञ असतो की तिने मला प्रेम करू दिले, तिने माझे प्रेम स्वीकारले. हेच पुरेसे आहे. मी तिच्यासाठी कैदखाना बनत नाही. तिने माझ्यावर प्रेम केले व बदल्यात मी तिच्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? मी तिच्यावर प्रेम केले व बदल्यात ती माझ्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? आम्ही एकमेकांना चांगला पुरस्कार देत आहोत.

जर मी कुणावर प्रेम करतो तेव्हा मी तिचा कृतज्ञ असतो व तिचे स्वातंत्र्य कायम असते. मी तिला स्वातंत्र्य दिले नाही. हा तिचा जन्मसिद्ध हक्क आहे व माझे प्रेम तिचा हक्क हिरावून घेऊ शकत नाही. तुमचे प्रेम असलेल्या व्यक्तीकडून तुम्ही तिचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकता? मी तिला स्वातंत्र्य देतो असे सुद्धा तुम्ही म्हणू शकत नाही. तुम्ही कोण आहात? एक अनोळखी. तुम्ही दोघे योगायोगाने रस्त्यावर भेटले व तो महान आहे की, त्याने तुमचे प्रेम स्वीकारले. त्याच्याप्रती कृतज्ञ रहा व ज्याप्रमाणे जगू इच्छिता त्याप्रमाणे त्यास जगू द्या व तुम्हाला जसे जगायचे असेल तर जीवन जगा. तुमच्या जीवनशैलीत कुणी हस्तक्षेप करणार नाही. यास स्वातंत्र्य म्हणतात. तेव्हा प्रेम कमी तणावपूर्ण, कमी चिंताग्रस्त, कमी क्रुद्ध व जास्त प्रसन्न होण्यास मदतगार ठरेल.

जगात नेमके याउलट होत आहे. प्रेम खुप दु:खदायी असते व असेही लोक आहेत जे अखेरीस कुणावरही प्रेम न चांगले असा निर्णय घेतात. ते आपल्या मनाचे दरवाजे बंद करतात.

पण प्रेमासाठी दरवाजा बंद करण्याचा अर्थ वास्तविकतेकडे, अस्तित्वाकडे पाठ फिरवणे आहे म्हणून मी याचे समर्थन करणार नाही. मी म्हणेन की, प्रेमाचे संपूर्ण स्वरूप बदला.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 4 | | |
| | | 5 | 8 | 7 | | | 1 | |
| | | | 2 | 6 | | | | 8 |
| 6 | | 1 | 7 | 4 | | 5 | | 2 |
| | 9 | | 6 | 2 | 3 | | 8 | |
| 2 | | 4 | | 1 | 8 | 6 | | 7 |
| 7 | | | | 5 | 6 | | | |
| | 6 | | | 9 | 2 | 7 | | |
| | | 9 | 1 | | | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

#### सूडोकु क्र. १२६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 2 | 6 | 7 | 1 | 9 | 8 | 5 |
| 5 | 6 | 1 | 3 | 9 | 8 | 4 | 7 | 2 |
| 7 | 9 | 8 | 5 | 2 | 4 | 3 | 6 | 1 |
| 6 | 1 | 7 | 9 | 5 | 2 | 8 | 4 | 3 |
| 9 | 2 | 3 | 4 | 8 | 6 | 1 | 5 | 7 |
| 8 | 5 | 4 | 7 | 1 | 3 | 6 | 2 | 9 |
| 3 | 7 | 6 | 1 | 4 | 5 | 2 | 9 | 8 |
| 1 | 8 | 9 | 2 | 6 | 7 | 5 | 3 | 4 |
| 2 | 4 | 5 | 8 | 3 | 9 | 7 | 1 | 6 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९१८ – झीब्रग्गीचा युद्ध समाप्त.
- १९५० – चीनच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांनी हैनन द्विप रिकामे केले.
- १९७७ – एड्स व्हायरसची ओळख पटली.
- १९९१ – वेस्टइंडीजचा फलंदाज गॉर्डन ग्रीनेज ने आपल्या शेवटच्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलिया विरुद्ध २२३ धावा ठोकल्या.
- २००६ – जवाद अल मलिकी इराकचे नवे पंतप्रधान बनले.
- २००७ – अमेरिकी हल्ल्यात १८ अलकायदा कट्टरपंथीय ठार झाले.

### जन्म

- १४६४ – फ्रान्सची राणी जोहन्ना वान वलोईसचा जन्म.
- १८२३ – तुर्कीच्या ३१वा सुल्तान अब्दुल मेदजेदचा जन्म.
- १८५८ – पंडिता रमाबाईंचा जन्म.
- १८७३ – महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म.

### निधन

- १९८६ – इंग्लंडचा क्रिकेटपटू जेम लेकर याचे निधन.
- १९९१ – ग्रॉफीक्स डिजाईनर पीटर बेली याचे निधन.
- १९९२ – दिग्दर्शक सत्यजित रे यांचे निधन.
- २००७ – बोरिस येल्तसिन यांचे निधन.

### राष्ट्रीय

- २००६ – माजी पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी 'जन मोर्चा' या नवीन राजकीय संघटनेच्या स्थापनेची घोषणा. राज बब्बर यांना जनमोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नियुक्त करण्यात आले.
- २००८ – प्रसिद्ध अभिनेता ओम पुरी यांची नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉरपोरेशन (एनएफडीसी) च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

## : SMS :

Thank you for touching my life in ways u may never know. My riches do not lie in material wealth but in having friends like u - a precious gift from God!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.३ | २६.२ |
| अहमदनगर | ३६.४ | २५.९ |
| अकोला | ४०.२ | २८.१ |
| अमरावती | ३८.६ | २६.८ |
| बीड | ४१.३ | ३०.४ |
| भंडारा | ४०.७ | २८.६ |
| बुलढाणा | ३६.६ | २१.५ |
| चंद्रपूर | ४१.८ | ३०.९ |
| चेन्नई | ४५.५ | ३३ |
| नवी दिल्ली | ३६.८ | २३.३ |
| धुळे | ३७.४ | २६ |
| गोंदिया | ३९.३ | २८.१ |
| जळगाव | ४०.२ | २७.२ |
| कोल्हापूर | ३७.२ | २४.७ |
| लातूर | ३६.८ | २४.५ |
| मुंबई | ३९ | ३०.७ |
| नागपूर | ३९.२ | २९.२ |
| नांदेड | ३९.३ | २६.८ |
| नंदूरबार | ३७ | २५.३ |
| नाशिक | ३६ | २२.९ |
| पुणे | ३४.६ | २३.९ |
| पंढरपूर | ३८.४ | २६ |
| सातारा | ३६.९ | २३.३ |
| सांगली | ३८.१ | २५.६ |
| सोलापूर | ३८.१ | २६.६ |
| वर्धा | ४०.८ | २८.५ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम
दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:दक्षिण
आर्थिक जबाबदारी संभाळा. विश्वासदर्शक वातावरण राहणार नाही.

**वृश्चिक :** शुभ रंग :जांभळा,शुभ दिशा:दक्षिण
निराशाजनक परिस्थिती राहील. आपल्या खर्चावर, देण्या घेण्यावर नियंत्रण ठेवा.

**मिथुन :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पूर्व
संघर्षाने योग्य अशी सफलता मिळेल. कुटुंबात आपल्या कामाला महत्व दिले जाईल. प्रवास शक्यतो करू नका.

**धनु :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :उत्तर
विविध मार्गांनी धन प्राप्तीचे योग. जीवनसाथीशी वैचारिक मतभेद होण्याचे योग आहेत.

**कर्क :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
कुटुंबात शुभ कार्याची योजना आखाल. विरोधकांवर विजय मिळवाल. अडकलेला पैसा मिळेल.

**मकर :** शुभ रंग:गुलाबी,शुभ दिशा: उत्तर
नोकरी, राजकारणात योग्य प्रतिसाद मिळेल. कुटुंबात शुभ कार्याचे आयोजन केले जाईल.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे.

**कन्या :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर
आर्थिक बाबतीतील एकादी चांगली बातमी ऐकण्यास मिळेल. व्यवसायात अपेक्षीत लाभ मिळेल.

**मीन :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२७



### आडवे शब्द

१. पगार
४. अमृत
५. श्रीकृष्णाचे गुरु
९. कामाचा झपाटा
११. गरजू
१३. सामूहिक आक्रोश
१५. केवळ
१६. सार्वभौम राजाने करण्याचा एक यज्ञ
१९. लोभी
२२. तल्लीन
२३. जाणे
२४. आश्रय
२६. बहिष्कार
२८. काटकी
२९. चांदणी
३१. नात्यातील कनिष्ठ
३३. अधीन
३४. मोफत
३६. पतीची वहिनी
३९. माधुर्य, आवड
४०. मनस्वी स्वाभावाचा, भटक्या
४२. दोनने भाग जाणारी संख्या, सारखा
४४. अवांतर
४७. गरम
४८. धूळ, कचरा
५०. सागर
५१. फुलाची पाकळी
५२. गत (काळ)
५३. अडचण, पेच
५४. रूढ, सध्याचे
५७. यज्ञातील आहुती
५९. विवाह
६०. शंकराची पत्नी
६१. रक्तवाहिनी
६२. पार्वतीचे एक उग्र रुप
६३. सगळे
६४. वानर
६६. एक प्राचीन वैद्यकतज्ञ
६७. तात्पर्य
६९. तृतीया
७१. पक्का
७३. अहंकार
७४. तिरळा
७५. अमावास्या
७७. संघर्ष
७८. अस्थमा
७९. आंबा
८१. उघडउघड, नि:संशय
८२. जंगल
८३. सीतेला वनात पाठवणारा
८४. शोध
८५. बासुंदीपेक्षा घट्ट पदार्थ
८६. लग्नाआधीचा एक रूढी म्हणून केला जाणारा कार्यक्रम
८८. बाई
८९. गवत
९०. जीर्ण व फाटकी वस्त्रे
९१. लोकसभा व राज्यसभा सदस्य

### उभे शब्द

१. '.......रचुनी त्यांचे झेले एकमेकावरी उधळले, गेले ते दिले गेले' (कवी–भवानीशंकर)
२. होडी, ३. दृष्टी
४. किंचितही, अजिबात
६. नवऱ्याचा भाऊ
७. होडीचा एक प्रकार, मुक्काम
८. पाणी
९. विपरित, उलट
१०. रुधिर
१२. अश्रू
१४. फांदी
१७. प्रजा
१८. जसा
२०. इनामात मिळालेली जमीन
२१. गणपती
२३. नोकर
२५. कृष्णाची सखी
२६. हिस्सा
२७. कपर्दिक
२८. कष्टाळू
३०. नृप
३२. कुंतीचा पहिला पुत्र
३५. पोट
३७. यापासून साखर बनते
३८. सहापैकी चांदण्याचा ऋतु
३९. मधुर
४१. अंगावर दागिने नसलेली (ला.)
४३. सहाय्य
४५. भांडण
४६. हे बघायला आरसा कशाला?
४९. केस
५४. सांकेतिक चिन्ह
५५. लेखनपद्धती
५६. हिंमत
५८. आजार
६१. जमीन, धरणी
६५. दारूचा गुत्ता
६७. संचय
६८. फावला वेळ
७०. पोहणे
७२. रतीचा पती
७३. तांबे
७५. खालचा ओठ
७६. श्रीमंत, धनवान
७९. आंब्याचा रस
८०. चरबी
८२. जनक, पिता
८३. भस्म
८४. रट्टा, धपाटा
८६. सप्तसुरातील पहिले दोन
८७. शहरातील नागरिक

### जम्बो शब्दकोडे क्र. १२६ चे उत्तर

आडवे उत्तर : १.श्याम ३.बासरी ५.सुदर्शन चक्र ९.मारा ११.हिम १३.मदार १४.यजमान १६.जलाशय १७.सुरमा १८.विरह २०.वरण २१.वारा २२.मार्ग २४.डाकू २६.राजमहल २८.बालक ३०.पदापर्ण ३३.आडकाठी ३५.ताण ३६.किल्मिष ३७.खरवस ३९.सुतार ४१.सरकी ४२.जोडा ४३.चुरस ४४.धार ४७.जंगी ४८.सट्टा ४९.तपोवन ५०.हतभागी ५२.तग ५३.सय ५४.सौम्य ५६.कर ५७.आगळीक ५९.साजण ६१.डाक ६२.माता ६३.अथर्व ६४.खतावणी ६६.डेअरी ६९.सुगम ७०.रस ७१.ओ ७२.वचक ७४.डिकी ७६.गरीब ७७.माका ७९.शचि ८०.तरबेज ८१.लीलया ८२.ओकारी ८३.तरंग

उभे उत्तर : २.महिला ४.सखी ५.सुदामा ६.दर ७.नकार ८.क्रय ९.मामा १०.रानटी १२.मशक १३.मरण १५.जव १६.जबडा १७.सुरभी १८.विराम १९.हमाल २१.वाजवी २३.हलका २५.कूप २५ अ.दर्पण २७.हाजिर २८.बाड २९.कठीण समय येता ३१.दातार ३२.वाल्मिकी ३३.आस ३४.वसुधा ३६.किरटा ३७.खडाजंगी ३८.वसा ४०.तारतम्य ४३.चुट्टा ४५.अवनी ४६.शतक ४८.सगळीकडे ५१.भार ५२.तगडा ५४.सौर ५५.बजरंगबली ५८.अथवा ६०.दिवस ६२.मारीच ६५.तारका ६७.अवचित ६८.तडीत ६९.सुरी ७३.कजाग ७५.कीर ७६.गज ७७.माया ७८.हेका

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### जीआयआयएस स्कूल हडपसरची सीबीएसई 2026 निकालांत आश्वासक कामगिरी

पुणे (दैनिक संध्या) : ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयसी), हडपसरच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बोर्डाच्या इयत्ता १० वीच्या ताज्या निकालात सातत्यपूर्ण शैक्षणिक कामगिरी बजावली असून बोर्डात ९८.७९% गुणांची अव्वल कमाई केली आहे. तसेच ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस) हडपसरच्या एकूण ५३.०१% विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले असून जागतिक दर्जाच्या शिक्षणासाठी उत्कृष्ट संस्था म्हणून शाळेला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. या बॅचमधील अनन्या राजोळ (९८.६०%) अव्वल असून दुसऱ्या क्रमांकावर इशिता झिंजाडे (९८.४०%), तिसऱ्या क्रमांकावर भुवी नीलेश बोंडे, श्रीश सतीश कुमार, तनिरिका बन्सल (९७.६०%) चमकले आहेत. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना, ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस) हडपसरचे प्राचार्य डॉ. विजय परिहार म्हणाले, "यंदा पुन्हा एकदा आमच्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी आपल्यासमोर सांगताना आम्हाला मोठा अभिमान वाटत आहे. इयत्तेत ८८.५% ची प्रभावी सरासरी आणि सर्वोच्च ९८.६०% मिळविण्याचा मान राखत आमच्या विद्यार्थ्यांनी खरोखर उत्कृष्टतेचा मापदंड निर्माण केला आहे. हे यश त्यांचे समर्पण, चिकाटी आणि आमचे शिक्षक तसेच पालकांचा अतूट पाठिंबा यांचे दर्शन घडविणारा आहे. आम्ही प्रत्येक विद्यार्थ्याचे त्यांनी केलेल्या मेहनतीकरिता अभिनंदन करतो. तसेच त्यांच्या भविष्यातील सर्व प्रयत्नांमध्ये निरंतर यश लाभू दे, अशी इच्छा व्यक्त करतो."

### वनप्लस नॉर्ड सीई 6 ऑल-राउंडर परफॉर्मन्स आणि ड्युरॅबिलिटीसह 7 मे रोजी लॉन्च

पुणे (दैनिक संध्या) : -ग्लोबल टेक्नॉलॉजी ब्रँड वनप्लस ने भारतात वनप्लस नॉर्ड सीई ६ सिरीज च्या लॉन्चची घोषणा केली आहे. हा नवा लाइनअप 7 मे रोजी डेब्यू करणार असून यात वनप्लस नॉर्ड सीई ६ आणि दोन वर्षांनंतर परत येणारा कम्युनिटी फेव्हरेट वनप्लस नॉर्ड सीई ६ लाइट समाविष्ट आहे. वनप्लस च्या "फास्ट अँड स्मूथ" अनुभवाच्या परंपरेला पुढे नेत, ही सीरीज पॉवरफुल परफॉर्मन्स, विश्वासार्ह एंड्युरन्स आणि रिफाइन्ड डिझाइन एकत्र आणते, जे रोजच्या वापरासाठी आदर्श आहे. वनप्लस नॉर्ड सीई ६ तीन आकर्षक कलर ऑप्शन्समध्ये उपलब्ध असेल फ्रेश ब्ल्यू, लूनर पर्ल आणि पिच ब्लॅक. हे कलरवे प्रीमियम डिझाइन आणि मजबूत टिकाऊपणाचा संगम दाखवतात. वनप्लस नॉर्ड सीई ६ लाइट, जो वनप्लस नॉर्ड सीई 4 लाइट चा उत्तराधिकारी आहे (ॲमेझॉन वर सेलच्या दिवशी सर्वाधिक विक्री झालेला स्मार्टफोन), दोन स्टायलिश फिनिशेसमध्ये येईल व्हिव्हिड मिंट आणि हायपर ब्लॅक. हे कलर ऑप्शन्स बोल्ड पण मिनिमल स्टाइल पसंत करणाऱ्या यूजर्ससाठी खास आहेत. ऑल-राउंडर परफॉर्मर म्हणून डिझाइन केलेला वनप्लस नॉर्ड सीई ६ पॉवर, एफिशियन्सी आणि रिस्पॉन्सिव्हनेस यांचा काळजीपूर्वक तयार केलेला संगम आहे. याच्या कोअरमध्ये स्नॅपड्रॅगन ७एस जेन 4 मोबाइल प्लॅटफॉर्म असून त्यासोबत डेडिकेटेड टच रिफ्लेक्स चिप दिली आहे. या ड्युअल-चिप आर्किटेक्चरमुळे रोजच्या कामांमध्ये तसेच हाय-इंटेन्सिटी गेमिंगमध्ये सतत स्मूथ परफॉर्मन्स मिळतो. या ॲडव्हान्स सेटअपमुळे १४४ एफपीएस पर्यंत अल्ट्रा-स्मूथ गेमप्ले शक्य होतो. त्यासोबतच ३२०० हर्ट्झ च्या इन्स्टंट आणि अत्यंत रिस्पॉन्सिव्ह टच सॅम्पलिंग रेटमुळे टच प्रिसिजन आणखी सुधारतो ज्यामुळे सेगमेंटमध्ये लीडिंग अनुभव मिळतो. किंमत, उपलब्धता आणि लॉन्च ऑफर्सची अधिक माहिती 7 मे रोजी दुपारी 12 वाजता जाहीर केली जाईल. वनप्लस नॉर्ड सीई ६ सोबतच वनप्लस नॉर्ड सीई ६ लाइट देखील डेब्यू करणार आहे. यामुळे दोन वर्षांनंतर कम्युनिटी फेव्हरेट 'कोर एडिशन' लाइट सीरीज भारतात परत येत आहे आणि ग्राहकांसाठी अधिक ॲक्सेसिबल पर्याय उपलब्ध होणार आहे.

### बालेवाडीच्या शाळेच्या इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

पुणे (दैनिक संध्या) : ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस) बालेवाडीच्या विद्यार्थ्यांनी अलीकडेच जाहीर झालेल्या इयत्ता १० वीच्या परीक्षेत दिमाखदार कामगिरी केली असून दहावीच्या एकंदर ९८.००% विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी पटकावली आहे. विशेष म्हणजे, जीआयआयएस बालेवाडीच्या एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४८.५०% गुणवंतांनी ९०% पेक्षा अधिक गुणांची कमाई केली आहे. दहाव्या इयत्तेत वंशित कुमारने ९८.४० टक्के गुण मिळवून पहिला, निमिषा दुबेने ९८.०० टक्के गुण मिळवून दुसरा तर ऋषभ कश्यपने ९७.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकावला. "ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल (जीआयआयएस), बालेवाडीच्या उत्कृष्ट बोर्ड निकालांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमाचे हे फळ आहे, असे ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल, बालेवाडीच्या मुख्याध्यापिका मुनमुन चक्रवर्ती म्हणाल्या.

### इयत्ता 10वीच्या परीक्षेत अमनोरा स्कूल ने नोंदविले उत्तुंग यश



पुणे (दैनिक संध्या) : अमनोरा स्कूलने पुन्हा एकदा शैक्षणिक उत्कृष्टतेचा ठसा उमटवत दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. शाळेने 100% निकाल साध्य केला असून विद्यार्थ्यांनी सर्व विषयांत उच्च गुण मिळवले आहेत. शैक्षणिक यशामध्ये आघाडीवर असलेले शाळेचे टॉपर विद्यार्थी असे आहेत: करण ओबेरॉय यांनी उल्लेखनीय 99% गुण मिळवले, त्यानंतर रुची शिरशाट यांनी 98.8% आणि जस्मिता कर यांनी 98.6% गुण मिळवले. त्यांचे यश हे सातत्यपूर्ण मेहनत, दृढनिश्चय आणि संस्थेकडून मिळालेल्या भक्कम शैक्षणिक पाठबळाचे प्रतिबिंब आहे. शाळेच्या यशाचे श्रेय सुबक अभ्यासक्रम, सातत्यपूर्ण मूल्यमापन प्रणाली आणि शिक्षकांच्या निष्ठावान प्रयत्नांना जाते. अमनोरा स्कूल विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनात्मक समज, चिकित्सक विचारशक्ती आणि सर्वांगीण विकास घडविण्यावर भर देते. या अभिमानास्पद प्रसंगी संचालक प्राचार्य मीरा नायर, मुख्याध्यापिका अमृता गंगवाल आणि इयत्ता 9 व 10 समन्वयक गीता शिवकुमार यांनी संपूर्ण शिक्षकवर्गासह विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले तसेच पालक आणि शिक्षकांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. "ही उपलब्धी आमच्या विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे आणि आमच्या शिक्षकांच्या समर्पणाचे प्रतिबिंब आहे, ज्यांनी त्यांना सातत्याने मार्गदर्शन आणि समर्थन दिले आहे," असे शाळा प्रशासनाने सांगितले. इयत्ता 11वीचे प्रवेश आता सुरू असून मर्यादित जागा उपलब्ध आहेत. शाळा इच्छुक विद्यार्थ्यांना आपल्या गतिमान शैक्षणिक समुदायाचा भाग होण्यासाठी आमंत्रित करते. हे उत्कृष्ट निकाल अमनोरा स्कूलच्या उत्कृष्टतेच्या बांधिलकीला अधोरेखित करतात आणि भावी पिढ्यांना यशासाठी प्रेरित करतात.

# 'दगडूशेठ' ट्रस्टच्या मोफत आरोग्य सेवा केंद्राचे लोकार्पण

## जय गणेश रुग्णसेवा अभियान ; विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार






**पुणे (दै. संध्या)**

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगिकारून सातत्याने समाजासाठी कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट तर्फे साकारलेल्या मोफत आरोग्य सेवा केंद्राचे लोकार्पण झाले. सारसबागेजवळील बाबुराव सणस मैदानासमोर असलेल्या हिराबाग कोठी परिसरात हे केंद्र उभारण्यात आले आहे. यामध्ये रुग्णांना विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार आहेत.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने उभारलेल्या या केंद्राचे उद्घाटन राज्याच्या आरोग्य सेवा विभागाचे संचालक डॉ.विजय कंदेवाढ यांच्या हस्ते झाले. यावेळी पुणे मनपा आरोग्य प्रमुख डॉ.नीना बोराडे, आयएमए चे डॉ.विरेंद्र ओस्तवाल, डॉ.अमरीश दरक, डॉ.संदेश पटवर्धन, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांसह आरोग्य क्षेत्रातील मान्यवर, ट्रस्टचे पदाधिकारी व मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी हे येथील व्यवस्था पहात आहेत.

**सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते ५ पर्यंत मिळणार मोफत आरोग्य सेवा**

मोफत आरोग्य सेवा केंद्र हे सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते ५ पर्यंत खुले राहणार असून येथे विविध प्रकारच्या तपासणी, औषधे व श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव मोफत मिळणार आहेत. यामध्ये विविध रक्त तपासणी, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, जनरल ओपीडी, हृदय ईसीजी, दंत तपासणी, दात काढणे, लहान बालकांकरिता लसीकरण सुविधा, कृत्रिम हात व पाय वाटप नोंदणी, श्रवण तपासणी होणार आहे. याकरिता तज्ज्ञ डॉक्टरांची टीम येथे कार्यरत असणार आहे. अधिक माहितीसाठी हेल्पलाईन क्रमांक ९८८१५१६५१७/ ९९२३५१६५१७ या क्रमांकावर संपर्क साधावा. तरी रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी केले आहे.

डॉ. विजय कंदेवाढ म्हणाले, आज आरोग्यासाठी खूप काही करण्याची आवश्यकता आहे. ट्रस्टने उभारलेल्या या मोफत आरोग्य केंद्राचा लाभ गोरगरीब जनतेला होणार आहे. मोबाईल आरोग्य व्हॅन ही उत्तम संकल्पना असून दात, डोळे आणि कानाची तपासणी दुर्गम, ग्रामीण भागात करून आरोग्य सेवा देता येणार आहे.

हेमंत रासने म्हणाले, हजारो रुग्णांना दिलासा देण्याचे काम जय गणेश रुग्णसेवा अभियानाच्या माध्यमातून होत आहे. शासकीय व धर्मादाय यंत्रणांनी यामध्ये ट्रस्टला मोठे सहकार्य केले आहे. पुणे शहर आणि आपले महाराष्ट्र राज्य निरोगी राहावे, हा यामागील उद्देश आहे. सर्वांना आरोग्यसेवा तत्परतेने मिळतील असा प्रयत्न यामाध्यमातून केला जाणार आहे.

## कोंढव्यात पाणीटंचाई आणि टँकर अपघातांवर उपाययोजना

**पुणे (दै. संध्या)**

दक्षिण पुण्यातील वाढती पाणीटंचाई, भरधाव टँकरमुळे होणारे अपघात, नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. 20 एप्रिल) कोंढवा पोलिस ठाण्यात महत्त्वपूर्ण सामुदायिक बैठक पार पडली. या बैठकीत पाणीपुरवठा करण्यासाठी कोंढव्यासह परिसरात इतर ठिकाणी तीन पाण्याच्या टाक्या व पाइपलाइन कार्यान्वित करण्यात येतील, अशी हमी पालिकेच्या वतीने देण्यात आली.

एनआयबीएम ॲनेक्स, महंम्मदवाडी आणि उंड्री परिसरातील रहिवासी, पोलिस प्रशासन आणि महानगरपालिका अधिकारी एकाच व्यासपीठावर येत वाहतूक कोंडी, रस्ते सुरक्षा आणि पाणीटंचाई या ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. याबाबत दैनिक 'पुढारी'ने टँकरचालक आणखी किती निष्पापांचे बळी घेणार, असे वृत्त प्रसिद्ध करून येथील अपघात व पाणी प्रश्नावर प्रकाश टाकला होता, या धर्तीवर नुकतीच बैठक पार पडली, त्यामध्ये ठोस निर्णय घेण्यात आला.

बैठकीला अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपायुक्त (वाहतूक) हिम्मत जाधव यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते. तसेच पुणे महानगरपालिकेच्या पाणी विभागाचे प्रतिनिधी अधिकारी जगताप यांनीही सहभाग नोंदवला. नागरिकांमधून राज सिंग, शमिम हासिमखान पठाण, छबिल पटेल, अशोक मेंडाळे आणि शहनवाज शेख यांनी समस्यांची ठळक मांडणी केली.

## विलोभनीय सायंकाळ



विलोभनीय सूर्यास्त - दिवसभराची उन्हाची दाहकता यामुळे शांत वाटणारे दुपारचे गाव मात्र मावळत्या सूर्यकिरणे नाहून गेलेली सोनेरी सायंकाळ डोळ्याला सुखावत होती हे विलोभनीय दृश्य ऐतिहासिक होळकर तलवाचे सौदर्य खुलवत होते. (फोटो -विजयकुमार हरिश्चंद्रे )

# वाचनसंस्कृतीचा दीपस्तंभ : 'जागतिक पुस्तक दिन'

**पुणे (दै. संध्या)**

२३ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक पुस्तक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ पुस्तकांचा गौरव करण्यापुरता मर्यादित नसून तो ज्ञान, विचार, संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या जतनाचा व प्रसाराचा उत्सव आहे. मानवी सभ्यतेच्या इतिहासात पुस्तकांनी जे योगदान दिले आहे, ते अनमोल आहे. शब्दांच्या माध्यमातून माणसाने आपल्या अनुभवांना, विचारांना, ज्ञानाला आणि संस्कृतीला आकार दिला आणि ते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवले. त्यामुळे पुस्तक हे केवळ अक्षरांचा संच नसून ते मानवी उत्क्रांतीचे आणि सामाजिक प्रगतीचे सशक्त साधन आहे. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला या महत्त्वाची जाणीव करून देणारा आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी देणारा एक प्रेरणादायी दिवस आहे.

मानवाच्या आरंभीच्या काळात ज्ञानाची देवाणघेवाण तोंडी परंपरेतून होत असे. कथा, लोकपरंपरा, धार्मिक विधी आणि जीवनातील अनुभव यांद्वारे ज्ञान पिढ्यानपिढ्या पुढे जात होते. परंतु लिपीचा शोध लागल्यानंतर ज्ञानाचे लिखित स्वरूपात जतन होऊ लागले आणि तेच पुढे पुस्तकांच्या स्वरूपात विकसित झाले. भारतीय संस्कृतीमध्ये वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, बौद्ध त्रिपिटक, जैन आगम, संत साहित्य आणि विविध तत्त्वज्ञानपर ग्रंथांनी ज्ञानपरंपरेचा भक्कम पाया घातला. या ग्रंथांमध्ये केवळ धार्मिक किंवा तात्त्विक विचार नाहीत, तर मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये, सामाजिक संरचना आणि जीवनपद्धती यांचा सखोल अभ्यास आढळतो. त्यामुळे पुस्तक हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक ठरते.

वाचन ही एक सवय नसून ती एक संस्कारप्रक्रिया आहे. वाचनामुळे व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना मिळते, कल्पनाशक्ती विस्तारते आणि विवेकबुद्धी विकसित होते. एखादे पुस्तक वाचताना वाचक त्या लेखकाच्या अनुभवविश्वात प्रवेश करतो आणि विविध भावविश्वांचा अनुभव घेतो. त्यामुळे वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती आत्मविकासाची एक सर्जनशील यात्रा आहे. वाचनामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, विचारशील आणि समंजस बनते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा विचारशील व्यक्तींची आवश्यकता असते.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीचा स्फोट झाला आहे. मोबाईल, इंटरनेट, सामाजिक माध्यमे यांमुळे माहिती सहज उपलब्ध झाली आहे. परंतु या माहितीच्या महासागरात सखोल ज्ञान हरवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती ही तात्पुरती आणि तुकड्यांमध्ये मिळणारी असते, तर ज्ञान हे सुसंगत, सखोल आणि टिकाऊ असते. पुस्तक वाचनामुळेच हे सखोल ज्ञान आत्मसात करता येते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करत असतानाही पुस्तक वाचनाची सवय जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. डिजिटल माध्यमे ही पूरक साधने असू शकतात, परंतु त्यांची जागा पुस्तक घेऊ शकत नाही.




विद्यार्थी जीवनात वाचनाचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. पाठ्यपुस्तकांपुरते शिक्षण मर्यादित ठेवणे योग्य नाही. विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, चरित्रे, विज्ञान, इतिहास, साहित्य, समाजशास्त्र, अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील पुस्तके वाचल्यास विद्यार्थ्यांची ज्ञानाची व्याप्ती वाढते. वाचनामुळे भाषिक कौशल्ये विकसित होतात, शब्दसंपदा वाढते आणि विचार मांडण्याची क्षमता सुधारते. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर वाचनसंस्कृती रुजवणे अत्यंत गरजेचे आहे.

समाजाच्या दृष्टीने पाहिले, तर वाचनसंस्कृती असलेला समाज अधिक प्रगत आणि जागरूक असतो. वाचनामुळे नागरिकांमध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्नांविषयी जाणीव निर्माण होते. पुस्तकांच्या माध्यमातूनच अनेक सामाजिक चळवळींना बळ मिळाले आहे. समाजसुधारकांनी आपल्या लेखनातून समाजातील अन्याय, विषमता आणि अज्ञानाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. त्यामुळे वाचनसंस्कृती ही लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत आवश्यक आहे.

मराठी साहित्य परंपरा अत्यंत समृद्ध आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी, पु. ल. देशपांडे यांसारख्या महान लेखकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजाला जागृत केले. त्यांच्या लेखनातून सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला गेला आणि परिवर्तनाची प्रेरणा दिली गेली. साहित्य हे समाजाचे आरसे आहे, असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे.

आजच्या काळात वाचनसंस्कृतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर, वेळेअभावी वाचनाकडे दुर्लक्ष, पुस्तकांच्या वाढत्या किंमती, तसेच ग्रंथालयांची अपुरी संख्या ही काही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः लहान मुलांमध्ये वाचनाची सवय कमी होत चालल्याचे दिसते. त्यामुळे बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी मुलांना पुस्तकांची ओळख करून द्यावी आणि त्यांच्यासोबत वाचनाचा आनंद घ्यावा.

ग्रंथालये ही वाचनसंस्कृतीची केंद्रे आहेत. ग्रामीण भागात ग्रंथालयांची संख्या वाढवणे आणि त्यांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी वाचनालये उभारून वाचनसंस्कृतीला चालना देता येऊ शकते. तसेच, पुस्तक प्रदर्शन, वाचन स्पर्धा, लेखक-वाचक संवाद, कथाकथन कार्यक्रम यांसारख्या उपक्रमांद्वारे वाचनाची आवड वाढवता येते.

'जागतिक पुस्तक दिन' साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे वाचनसंस्कृतीला चालना देणे आणि लेखकांच्या योगदानाचा गौरव करणे हा आहे. या दिवशी विविध ठिकाणी पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक कार्यक्रम, चर्चासत्रे आणि व्याख्याने आयोजित केली जातात. यामुळे लोकांमध्ये पुस्तकांविषयी जागरूकता निर्माण होते.

तंत्रज्ञानाच्या युगात ई-पुस्तके आणि ऑडिओ पुस्तके यांचा वापर वाढत आहे. ही साधने वाचनासाठी उपयुक्त ठरत असली, तरी पारंपरिक पुस्तकांचे महत्त्व अजूनही कायम आहे. पुस्तक हातात घेऊन वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाही पारंपरिक वाचनसंस्कृती जपणे आवश्यक आहे.

वाचनसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये आणि शासन यांनी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. 'दर महिन्याला एक पुस्तक' अशी संकल्पना राबवता येईल.

शेवटी असे म्हणता येईल की, पुस्तक हे मानवाच्या प्रगतीचे खरे साधन आहे. ज्ञान, संस्कार आणि विचार यांचे संगम म्हणजे पुस्तक. 'जागतिक पुस्तक दिन' हा आपल्याला वाचनाची प्रेरणा देणारा दिवस आहे. आजच्या युगात सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी वाचन अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने वाचनाची सवय जोपासून ज्ञानसमृद्ध समाजाच्या निर्मितीत आपला वाटा उचलावा, हीच या दिवसाची खरी शिकवण आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

## थोडक्यात पण महत्वाचे...



### देवाला स्पर्श करण्याचा भक्ताचा अधिकार संविधानापेक्षा मोठा आहे का?

मुंबई (दैनिक संध्या) :धार्मिक स्थळांवरील महिलांचा प्रवेश आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान मंगळवारी न्यायमूर्तींनी महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. जर एखाद्या भक्ताला केवळ त्याच्या जन्म किंवा लिंगाच्या कारणास्तव देवाला स्पर्श करण्यापासून रोखले जात असेल, तर अशावेळी संविधान त्या भक्ताच्या रक्षणासाठी पुढे येणार नाही का, असा रोकडा सवाल सर्वोच्च न्यायालयाने शबरीमला मंदिराच्या मुख्य पुजाऱ्यांना विचारला. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील नऊ न्यायमूर्तींचे घटनापीठ या प्रकरणाची सुनावणी करत आहे. मंदिराचे मुख्य पुजारी यांच्या वतीने ज्येष्ठ वकील व्ही. गिरी यांनी युक्तिवाद केला की, मंदिरातील विधी आणि परंपरा या धर्माचा अविभाज्य भाग असतात. जेव्हा एखादा भक्त मंदिरात येतो, तेव्हा त्याने देवतेच्या वैशिष्ट्यांचा सन्मान करणे आवश्यक असते. शबरीमला येथील भगवान अयप्पा हे नैष्ठिक ब्रह्मचारी रूपात आहेत, त्यामुळे तिथल्या परंपरा त्या संकल्पनेशी सुसंगत आहेत, असे गिरी यांनी नमूद केले. यावर न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांनी तीव्र प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, एक भक्त पूर्ण श्रद्धेने व शुद्ध अंतःकरणाने मंदिरात जातो. तिथे गेल्यावर केवळ जन्म, वंश किंवा एका विशिष्ट परिस्थितीमुळे त्याला देवाला स्पर्श करण्यास कायमस्वरूपी मनाई केली जाते, तेव्हा संविधान मदतीला धावून येणार नाही का? निर्माता (देव) आणि निर्मिती (मानव) यांच्यात असा भेदभाव कसा असू शकतो? यावर उत्तर देताना गिरी म्हणाले, केवळ जन्माच्या आधारावर कोणाला पुजारी होण्यापासून रोखले जात असेल, तर राज्य सरकार किंवा कलम 25(2)(ब) अंतर्गत कायदा त्याबाबत हस्तक्षेप करू शकतो. मात्र, देवतेचे स्वरूप आणि परंपरेचे रक्षण करणे हाही धार्मिक स्वातंत्र्याचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले. 2018 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने महिलांच्या प्रवेशावरील बंदी उठवली होती. याचा फेरविचार आता हे नऊ सदस्यीय खंडपीठ करत आहे. वैयक्तिक धार्मिक विश्वासांपेक्षा घटनात्मक चौकट महत्त्वाची असल्याचे न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले असून या सुनावणीकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.



### शाही थाटात पार पडला साखरपुड्याचा भव्य सोहळा !

पुणे (दैनिक संध्या) : मसालाकिंग धनंजय दातार आणि त्यांच्या पत्नी वंदना दातार यांनी आपल्या सुपुत्र रोहित दातार आणि सानिया नरवाडे यांच्या साखरपुड्याचा भव्य सोहळा मुंबईतील प्रतिष्ठित ताज लँड्स एंड येथे मोठ्या थाटामाटात आयोजित केला. या देखण्या संध्याकाळी कुटुंबीय, मित्रमंडळी आणि शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित राहून नव्या आयुष्याच्या प्रवासाला सुरुवात करणाऱ्या या जोडप्यावर आशीर्वादांचा वर्षाव केला. या सोहळ्यात एक अप्रतिम संगीतमय कार्यक्रम रंगला, ज्यामध्ये प्रसिद्ध गायक सुदेश भोसले आणि वैशाली सामंत यांच्या सादरीकरणांनी वातावरणात उत्साह आणि ऊर्जा भरली. या संगीतसंध्येला आणखी रंगत आणली ती सिद्धांत भोसले यांच्या मधुर आवाजाने, ज्यांनी आपल्या गायनाने उपस्थितांची मनं जिंकली. या खास प्रसंगी वराची आई वंदना दातार यांनी तालावर नृत्य करत आपल्या आनंदाची आणि उत्साहाची सुंदर अभिव्यक्ती केली, हा क्षण सर्वांसाठी खास ठरला. कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेत्री ‘नटरंग’ फेम सोनाली कुलकर्णी आणि मानसी नाईक यांच्या जोशपूर्ण नृत्य सादरीकरणांनी रंगत आणखी वाढवली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ चांदेकर यांनी केले, त्यांच्या उत्साही आणि आकर्षक उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. या सोहळ्याचे खास आकर्षण ठरले ते अनोखे रिंग सेरेमनी, जिथे साखरपुड्याच्या अंगठ्या ड्रोनद्वारे खाली आणण्यात आल्या, ज्यामुळे पारंपरिक विधींना आधुनिकतेचा एक सुंदर आणि अनोखा स्पर्श मिळाला आणि सर्व उपस्थित मंत्रमुग्ध झाले. याप्रसंगी धनंजय दातार म्हणाले, “या शुभदिनी आम्ही या जोडप्याला आयुष्यभर एकत्र राहण्याच्या, आशीर्वादांच्या आणि आनंदाच्या असंख्य क्षणांच्या हार्दिक शुभेच्छा देतो.” सानियाचे आई-वडील सीमा आणि कुमार नरवाडे यांनी कुटुंबीय आणि मित्रमंडळींचे मनापासून स्वागत केले आणि हा आनंदाचा क्षण उत्साहाने साजरा केला. रोहितचा मोठा भाऊ हृषिकेश दातार आणि त्यांची पत्नी आकांक्षा यांनीही उपस्थितांचे प्रेमपूर्वक स्वागत करत या सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला. संध्याकाळी शेवटी पाहुण्यांनी स्वादिष्ट आणि खास खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत, प्रेम, आनंद आणि एकत्रतेने भरलेला हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

### केरळमधील त्रिशूरमध्ये फटाका कारखान्यात भीषण स्फोट

केरळ (दैनिक संध्या) : केरळमधील त्रिशूर जिल्ह्यातील मुंडथिक्कोडु भागात मंगळवारी एका फटाका निर्मिती युनिटमध्ये भीषण स्फोट झाला. या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. शहरात आयोजित होणाऱ्या 'त्रिशूर पूरम' या वार्षिक हिंदू मंदिर उत्सवाची तयारी सुरू असतानाच हा अपघात झाला. या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. घटनेच्या ठिकाणी पोहोचलेल्या राज्य सरकारच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, स्फोट झाला त्यावेळी युनिटमध्ये सुमारे ४० लोक काम करत होते, कारण आयोजकांनी कर्मचाऱ्यांसाठी दुपारचे जेवण आणले होते. "आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार सात जण तेथून पळून जाण्यात यशस्वी झाले," असे अधिकाऱ्याने स्पष्ट केले. त्रिशूर पूरमच्या 'थिरुवंबाडी' गटासाठी आतिशबाजीचे नमुने (सॅम्पल्स) तयार केले जात असताना हा स्फोट झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेत आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला असून ५ जणांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्याचा साठा होता, ज्याला आग लागल्याने जोरदार स्फोट झाला. प्राथमिक माहितीनुसार सुमारे ४० जण जखमी झाल्याचे समोर आले होते, त्यापैकी किमान आठ जणांची प्रकृती गंभीर होती. घटनेनंतर लगेचच रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आणि प्रशासनाने त्रिशूर मेडिकल कॉलेजसह आसपासच्या रुग्णालयांना आणीबाणीच्या स्थितीसाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले. स्फोटानंतर परिसरात दाट धूर आणि आग पसरली, ज्यामुळे बचाव कार्यात अडचणी आल्या. घटनास्थळी असलेले अर्धवट जळलेले आणि न फुटलेले स्फोटक साहित्य यामुळे मदतकार्यात अडथळा येत होता. पोलीस आणि आपत्कालीन सेवांच्या पथकांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की त्याचा आवाज अनेक किलोमीटर दूरपर्यंत ऐकू आला.

# IRS अधिकाऱ्याच्या मुलीची घरात घुसून निर्घृण हत्या

## काही महिन्यांपूर्वीच कामावरून काढून टाकलेल्या जुन्या नोकरावर संशय

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**




दक्षिण दिल्लीतील उच्चभ्रू परिसर समजल्या जाणाऱ्या अमर कॉलनीतील कैलाश हिल्स येथे एका तरुणीची घरात गळा आवळून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मृत तरुणी ही १९९७ च्या बॅचमधील एका वरिष्ठ आयआरएस (IRS) अधिकाऱ्याची मुलगी असल्याची माहिती समोर आली असून, या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज सकाळी तरुणीचे आई-वडील नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉक आणि जिमसाठी घराबाहेर गेले होते. यावेळी तरुणी घरात एकटीच होती. याच संधीचा फायदा घेत आरोपीने घरात प्रवेश केला. आई-वडील घरी परतल्यानंतर त्यांना मुलीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळला. आरोपीने अत्यंत क्रूरपणे या तरुणीचा घातपात केला आहे. प्राथमिक तपासानुसार, मोबाईल चार्जरच्या वायरने गळा आवळून तिची हत्या करण्यात आली. घराची आणि मृतदेहाची अवस्था पाहता, हत्येपूर्वी तरुणीवर लैंगिक अत्याचार झाला असावा, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. मात्र, याला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही; पोस्टमॉर्टम अहवालानंतरच याबाबत स्पष्टता येईल.

या प्रकरणात पोलिसांनी घरामध्ये काम करणाऱ्या एका जुन्या नोकरावर संशय व्यक्त केला आहे. काही महिन्यांपूर्वीच त्याला कामावरून काढून टाकण्यात आले होते. तो सध्या बेपत्ता असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. जुन्या वादातून त्याने हे कृत्य केले असावे, असा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परिसरातील सर्व CCTV फुटेज तपासले जात आहेत.आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

फॉरेन्सिक टीमने घटनास्थळावरून महत्त्वाचे नमुने गोळा केले आहेत. संशयित आरोपी राजस्थानचा रहिवासी असून पोलीस सध्या त्याचा शोध घेत आहेत. मृत तरुणीने नुकतेच इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले होते आणि ती सध्या UPSC परीक्षेची तयारी करत होती. एका हुशार आणि उच्चशिक्षित तरुणीचा अशा प्रकारे अंत झाल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

# मोदींविरोधात कट की सुरक्षा यंत्रणांची चूक?

## राजस्थानातील पचपद्रा रिफायनरीतील भीषण आगीची उच्चस्तरीय चौकशी सुरू

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



राजस्थानमधील बालोतरा-जोधपूर परिसरातील पचपद्रा रिफायनरीमध्ये लागलेल्या भीषण आगीच्या घटनेनंतर आता उच्चस्तरीय तपासाला वेग आला आहे. या घटनेमुळे केवळ औद्योगिक नुकसानाचाच प्रश्न निर्माण झाला नाही, तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सुरक्षेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या आगीमागे काही कटकारस्थान आहे का, याचा शोध घेण्यासाठी अनेक केंद्रीय यंत्रणा सक्रिय झाल्या आहेत. National Investigation Agency (NIA), केंद्रीय गृहमंत्रालय, पेट्रोलियम मंत्रालयाची तांत्रिक टीम आणि इतर तज्ज्ञ घटनास्थळी दाखल झाले असून सखोल चौकशी सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासून कोणती संशयास्पद हालचाल झाली का, याचा बारकाईने अभ्यास केला जात आहे.

पंतप्रधानांच्या संभाव्य दौऱ्यापूर्वी अशा ठिकाणी सुरक्षा यंत्रणा अत्यंत दक्ष असतात. त्यामुळे ही घटना सुरक्षेतील त्रुटी मानली जावी का, असा सवाल उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर रिफायनरी परिसरातील सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, बाहेरील व्यक्तींच्या प्रवेशावर विशेष नियंत्रण ठेवले जात आहे.

सुमारे 79,000 कोटी रुपयांची गुंतवणूक करुन उभारण्यात आलेली ही मोठी रिफायनरी सुमारे 4,500 एकर क्षेत्रात पसरलेली आहे. येथे हजारो कर्मचारी काम करत असून, आगीत नेमके किती नुकसान झाले आहे याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, मुख्य उत्पादन युनिटला (क्रूड डिस्टिलेशन युनिट) मोठे नुकसान झाले नसल्यास 1 जुलैपर्यंत उत्पादन सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या घटनेची चौकशी अनेक स्तरांवर सुरू आहे. एकीकडे सुरक्षा यंत्रणा कटकारस्थानाच्या शक्यतेचा तपास करत आहेत, तर दुसरीकडे संबंधित कंपनीकडून अंतर्गत चौकशीही सुरू आहे. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार स्वतंत्र तांत्रिक तपास करण्याचाही विचार सुरू असल्याचे संकेत आहेत. दरम्यान, घटनास्थळी बीएसएफच्या हेलिकॉप्टरद्वारे तज्ज्ञांची टीम दाखल झाली. त्यांनी रिफायनरी परिसराची पाहणी करत कर्मचाऱ्यांची चौकशी केली आणि पुरावे गोळा केले. फॉरेन्सिक टीमनेही घटनास्थळी तपास करत महत्त्वाची माहिती गोळा केली आहे.

## गांजाच्या व्यसनात सॉफ्टवेअर इंजिनिअरने पगारा सोबत नोकरीही गमावली

**हैदराबाद (दै. संध्या) :**

व्यसन कोणतेही असो, ते केवळ एका व्यक्तीला नाही, तर संपूर्ण कुटुंबाला उद्ध्वस्त करते. व्यसनाचा भयंकर विळखा इतका घट्ट असतो की, त्याच्या पाशात अडकलेली व्यक्ती स्वतःचे भान विसरते आणि क्षणिक सुखाच्या नादात आयुष्यभराचे शिक्षण, कमाई, नाती आणि अस्तित्वही गमावून बसते. असंच काहीसे हैदराबादमधील सॉफ्टवेअर इंजिनिअरच्या बाबतीत झालं. त्याने आपल्या संपूर्ण महिन्याचा पगार त्यावरच उधळला. यानंतर या व्यसनातून मानसिक संतुलन गमावल्याने नोकरीही गमावली. गांजा विकत घ्यायला पैसे संपल्याने त्याने चक्क आपल्या राहत्या घरीच गांजाची शेती सुरू केली. हैदराबादच्या नाचाराम परिसरात ही धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

**गांजाचे व्यसनाचा विळखा**

सी.एच. शशिधर हा हैदराबादमधील एका नामांकित सॉफ्टवेअर कंपनीत कामाला होता. मात्र, काही महिन्यांतच त्याला गांजाचे व्यसन लागले. तो आपल्या पगारातील मोठा हिस्सा या व्यसनावर खर्च करू लागला. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, व्यसनामुळे कामावर लक्ष देणे कठीण झाल्याने शेवटी त्याने नोकरीही गमावली. खिशात पैसे नसल्याने शशिधरने नाचाराममधील गांधी नगर येथील आपल्या घराच्या छतावर (टेरेसवर) गांजाची झाडे लावण्यास सुरुवात केली. याबद्दल गुप्त माहिती मिळताच, रंगारेड्डी सक्तवसुली पथकाचे सर्कल इन्स्पेक्टर बालराज यांच्या नेतृत्वाखाली धाड टाकण्यात आली.

## तृणमूल काँग्रेसच्या विजयी घोडदौडीला रोखण्याचे आव्हान

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी १६ जिल्ह्यातील १५२ विधानसभा मतदारसंघात गुरुवारी मतदान होईल. या मतदारसंघांमध्ये एकूण १४७८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मंगळवारी, पहिल्या टप्प्यासाठीचा प्रचार थांबला. यानंतर दुसऱ्या टप्प्यासाठी २९ एप्रिल रोजी मतदान होईल. तर ४ मे रोजी निकाल जाहीर केला जाईल. या निवडणुकीत सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांमध्ये लढत आहे.

# 'देशाने शंभर टक्के इथेनॉल मिश्रणाकडे जावे'

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

पश्चिम आशियाई देशातील संकटामुळे देशाला ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याची आवश्यकता आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारताला येत्या काळात 100 टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी व्यक्त केले.

इंडियन फेडरेशन ऑफ ग्रीन एनर्जीच्या ग्रीन ट्रान्सपोर्ट परिषदेत ते बोलत होते. गडकरी म्हणाले, सध्या भारतीय वाहने ई-20 पेट्रोलवर चालू शकतात. मात्र गंज चढणे आणि इतर समस्या टाळण्यासाठी इंजिनमध्ये किरकोळ बदल करणे आवश्यक असते. ब्राझीलसारख्या देशांमध्ये 100 टक्के इथेनॉल मिश्रण केले जाते. भारताला आपली कच्च्या तेलाची भूक भागविण्यासाठी 87 टक्के आयातीवर अवलंबून राहावे लागते. जीवाश्म इंधनाच्या आयातीसाठी आपण 22 लाख कोटी रुपये खर्च करतो.

जीवाश्म इंधनामुळे प्रदूषणही वाढत आहे. म्हणूनच देशाला पर्यायी इंधन आणि जैवइंधनाचे उत्पादन वाढवण्यावर काम करणे गरजेचे आहे. पेट्रोल व डिझेल वाहनांचा वापर कमी करण्यास प्रोत्साहन देण्याची गरज आहे. परंतु आपण लोकांना पेट्रोल आणि डिझेल वाहने खरेदी करणे थांबवण्यास भाग पाडू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# आरक्षण उपवर्गीकरण होईपर्यंत राज्यात मेगा भरती थांबवा

## शासनाने तातडीने एम्पिरीकल डेटा गोळा करून तात्काळ उपवर्गीकरण लागू करा- आमदार अमित गोरखे

**मुंबई (दै. संध्या) :**




अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा राज्यात सध्या तीव्र झाला आहे. या पार्श्वभूमीवर मातंग समाज आणि इतर ५८ जातींच्या प्रतिनिधींनी मुंबईत एकत्र येत आपली भूमिका मांडली. यावेळी आमदार अमित गोरखे यांनी राज्य सरकारकडे 'एम्पिरीकल डेटा' आणि 'न्याय्य उपवर्गीकरणा'ची मागणी केली. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातू आणि डॉक्टर अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे अध्यक्ष श्री. सचिनभाऊ साठे आणि लहुजी शक्ती सेना (पॉवर कमिटी) प्रदेशाध्यक्ष कैलासदादा खंदारे, तसेच लहुजी शक्ती सेनेचे नारायण गायकवाड, बीडचे आनंद सुतार, मुंबईचे राजेश मोरे, सहदेव पाटोळे, नांदेडचे आनंद देगावकर, शाहीर सुनील साठे ही सर्व राज्य भरातील प्रमुख संघटनेचे नेते उपस्थित होते. १ ऑगस्ट २०२४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अंमलबजावणी करून महाराष्ट्रात तातडीने उपवर्गीकरण लागू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

पत्रकार परिषदेत बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा "समतेचा विचार" प्रत्यक्षात आणण्यासाठी अनुसूचित जातींमधील जे 'वंचितांतील वंचित' आहेत, त्यांना मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मार्ग मोकळा केला आहे. अनेक राज्यांनी याची अंमलबजावणी सुरू केली असून, महाराष्ट्रातही बदर समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर झाला आहे. जोपर्यंत हे उपवर्गीकरण शासन जाहीर करत नाही, तोपर्यंत राज्यात कोणतीही मेगा भरती होऊ नये, अशी आमची ठाम भूमिका आहे.

ते पुढे म्हणाले की, १९९१ ते २०११ च्या जनगणनेतील तफावत पाहता, शासनाने तातडीने एम्पिरीकल डेटा (Empirical Data) गोळा करून त्याचे विश्लेषण करावे व उपवर्गीकरण करताना कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली जावी, मात्र जे घटक दशकांपासून सामाजिक न्यायाच्या लाभापासून दूर आहेत त्यांना त्यांचा हक्क मिळालाच पाहिजे.

लहुजी सेनेचे सचिनभाऊ साठे यांनी या मागणीला होणाऱ्या विरोधावर भाष्य केले. ते म्हणाले, हा लढा गेल्या ३०-४० वर्षांपासून सुरू आहे. आज जेव्हा न्याय मिळण्याची वेळ आली आहे, तेव्हा जाणीवपूर्वक गैरसमज पसरवून सामाजिक ऐक्य धोक्यात असल्याची भीती घातली जात आहे. हा एक 'छुपा अजेंडा' असून अनुसूचित जातींमधील ५९ जातींचे ऐक्य तोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. मातंग समाज व इतर पोटजाती आजही दारिद्र्य आणि संघर्षाच्या गर्तेत अडकल्या आहेत कारण त्यांना संधी मिळत नाहीये. शासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता या समाजांचे सर्वेक्षण करावे आणि आम्हाला न्याय द्यावा, आम्ही ५८ समाजातील नागरिक या लढ्यात शासनासोबत आहोत, असे देखील यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलासदादा खंदारे यांनी संविधानातील तरतुदींचा हवाला देत म्हटले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या प्रस्तावनेत 'संधीची समानता' आणि 'पुरेशा प्रमाणात प्रतिनिधित्व' या शब्दांचा वापर केला आहे. पंजाबसारख्या राज्यांनी ५० वर्षांपूर्वीच उपवर्गीकरण लागू केले, मग पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात आजही वंचित समाज उपेक्षित का? हा केवळ एका संघटनेचा प्रश्न नसून संपूर्ण महाराष्ट्रातील दुर्लक्षित घटकांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. बदर समितीच्या अहवालाने आमचे हक्क मिळणार असून सरकारने आता विलंब लावू नये.

प्रमुख मागण्या: 1) तातडीने उपवर्गीकरण: सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उपवर्गीकरण जाहीर करा. 2) भरतीला स्थगिती: वर्गीकरण निश्चित होईपर्यंत नवीन सरकारी भरती थांबवा. 3)एम्पिरीकल डेटा: लोकसंख्येतील मागासलेपण तपासण्यासाठी वैज्ञानिक माहिती गोळा करा. 4)न्याय्य वाटप: कोणत्याही समाजाचे नुकसान न करता आरक्षणाचे लाभ तळागाळापर्यंत पोहोचवा.

या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मातंग समाज आणि इतर ५८ जातींनी एकत्र येत सरकारला आपली शक्ती दाखवून दिली असून, लवकरच सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विकास कामांना गती द्या, पावसाळ्यापूर्वीची कामे हाती द्या; खा. श्रीरंग बारणे यांच्या सूचना

मावळ (दैनिक संध्या) : लोणावळा, तळेगाव दाभाडे नगरपरिषद आणि वडगाव नगरपंचायतीच्या हद्दीत सुरु असलेल्या विकास कामांना गती द्यावी. उन्हाळा सुरु असल्याने पुरेशा प्रमाणात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा. पाण्याच्या तक्रारी येऊ देऊ नका, पावसाळ्यापूर्वीची कामे हाती घ्यावीत. प्रलंबित कामांचे प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाकडे पाठवावेत. त्याला मान्यतेसह निधी मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. मावळ लोकसभा मतदारसंघातील लोणावळा, तळेगाव दाभाडे नगरपरिषद आणि वडगाव नगरपंचायतीच्या कामासंदर्भात खासदार बारणे यांनी सोमवारी आढावा बैठका घेतल्या. आमदार सुनील शेळके, तिन्ही नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, संबंधित विभागाचे सर्व अधिकारी बैठकांना उपस्थित होते. केंद्र, राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. तिन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात खासदार निधी उपलब्ध करुन दिला आहे. भविष्यातही निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही खासदार बारणे यांनी दिली. लोणावळ्यातील बैठकीला नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, उपनगराध्यक्ष देविदास कडू, सनी दळवी, दिपा आगरवाल, धनंजय काळोखे, जीवन गायकवाड, स्वप्ना कदम, सनी घोणे, मुकेश परमार, दत्तात्रय येवले, शिवासेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, उप तालुका प्रमुख सोमनाथ कोंडे, मदन शेडगे, शिवसेना लोणावळा शहर प्रमुख संजय भोईर, शिवसेना महिला लोणावळा शहर संघटिका मनीषाताई भांगरे, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, शिवसेना लोणावळा उप शहर प्रमुख विशाल पाठारे, वडगाव नगरपंचायतीमधील बैठकीला उपनगराध्यक्ष सुनिल ढोरे, विरोधी पक्षनेत्या अर्चनाताई म्हाळस्कर, मुख्याधिकारी प्रवीण निकम, युवासेना तालुका प्रमुख विशाल आणि तळेगावमधील बैठकीला नगराध्यक्ष संतोष दाभाडे, मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, शिवसेना तळेगाव दाभाडे शहर प्रमुख देव खरटमल, सुनिल (मुन्ना) मोरे उपस्थित होते

### आरटीओ सेवा पूर्णपणे ऑनलाईन; 'सारथी' आणि 'वाहन 4.0'मधून 105 सेवा उपलब्ध

पिंपरी (दैनिक संध्या) : आरटीओ कार्यालयातील कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी; तसेच नागरिकांची धावपळ थांबवण्यासाठी सारथी आणि वाहन 4.0 या डिजिटल प्रणालीद्वारे सुमारे 105 सेवा ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या आहेत. आरटीओ कार्यालय पूर्णपणे ऑनलाईन प्रणालीशी जोडले गेले आहे. त्यामुळे नागरिक व वाहनचालकांना आरटीओ कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाहीत. सारथी व वाहन 4.0 या डिजिटल प्लॅटफॉर्मवर वाहन नोंदणी, पत्ताबदल, नूतनीकरण, डुप्लिकेट आरसी, ड्रायव्हिंग लायसन्स, ई-चलान, वाहन मालकी हस्तांतरण इत्यादी 105 सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांचे काम वेळेत होणार असून, या सुविधांसाठी एजंटची गरज लागणार नाही. पूर्वी वाहनासंबंधित कागदोपत्री कामकाजासाठी नागरिकांचा तसेच वाहनचालकांचा आरटीओ कार्यालयात वेळ जात असे; परंतु नागरिकांना आता घरबसल्या विविध सुविधा उपलब्ध झाल्याने हे काम वेगवान सुरळीत होणार आहे. अनेक नागरिक एजंट व मध्यस्थामार्फत संबंधित कागदपत्रे मिळवित होते; मात्र आता तुम्ही थेट सरकारी पोर्टलवर अर्ज करू शकता. यामुळे अनावश्यक खर्च टाळता येणार आहे. तसेच सर्व प्रकिया पारदर्शक आणि ट्रॅक करण्यायोग्य झाल्या आहेत. यासाठी संकेतस्थळावर गेल्यानंतर आपण ज्या राज्यात राहतो. ते राज्य निवडावे. त्यानंतर आवश्यक सेवा निवडावी लागणार आहे. त्यानंतर त्या संबंधित माहिती भरून तुमची कागदपत्रे अपलोड करावी लागतात. अर्ज क्रमांक नोंदवला जातो. संबंधित कामाच्या कालावधीनुसार तुमचे काम वेळेत होऊ शकणार आहे; तसेच आपल्या अर्जातील कामाची सद्यस्थिती काय आहे, हेदेखील अर्जदार ट्रॅक करू शकणार आहे. सारथीमार्फत मिळणाऱ्या सेवामध्ये शिकाऊ अनुज्ञप्ती आणि अनुज्ञप्ती परवाना अर्ज, वर्ग जोडणी, ऑनलाईन टेस्ट अपॉइंटमेंट बुकिंग करणे, अनुज्ञप्ती परवाना नूतनीकरण, नवीन वाहन वर्ग जोडणे, दुबार अनुज्ञप्ती परवाना , पत्ता बदल, अर्ज स्थिती आदी सेवा ऑनलाईन उपलब्ध झाल्या आहेत. तसेच वाहन नोंदणी 4.0 द्वारे वाहन नोंदणी, मालकी हस्तांतरण, दुबार आरसी, एनओसी, ई-चलान, वाहन फिटनेस प्रमाणपत्र भरणे, पत्ता बदल, आदी सेवा सुरू करण्यात आल्या आहेत.




### पीएमआरडीएकडून 'सर्वांसाठी घरे' मोहिमेला वेग; पीएमएवायअंतर्गत 3,317 घरांचे वाटप

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेतून सर्वसामान्यांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्याच्या मोहिमेला मोठी गती दिली आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यात 'पीएमआरडीए' हे पुणे विभागातील सर्वात मोठे प्राधिकरण ठरले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (पीएमएवाय) सर्वाधिक 3,317 घरे देऊन प्राधिकरणाने गोरगरिबांच्या घराचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे. हक्काच्या घरासाठी 2021 पासून उभारण्यात येत असलेल्या या सदनिकांसाठी 8 एप्रिल रोजी पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते पहिल्या टप्प्यातील सोडत काढण्यात आली होती. यामध्ये पेठ क्रमांक 12 व 30-32 मधील एकूण 1,029 घरांचा समावेश होता. आता दुसऱ्या टप्प्यातील घरांसाठी सेक्टर 12, फेज 1 आणि 31-32 या भागात प्राधिकरणाने आतापर्यंत ईडब्ल्यूएससाठी 4,882 आणि अल्प उत्पन्न गटासाठी (एलआयजी) 1,565 घरांचे नियोजन केले आहे. पेठ क्रमांक 12, टप्पा 2 अंतर्गत 6,452 सदनिकांचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पाचे सुमारे 82 टक्के काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पात ईडब्ल्यूएस 'ए' प्रकारच्या 3,320 सदनिका आणि ईडब्ल्यूएस 'बी' प्रकारच्या 332 सदनिका बांधण्यात येत आहेत. तसेच, एलआयजी 'ए' गटातील 1,456 सदनिका आणि 'बी' गटातील 1,344 सदनिकांचा यात समावेश आहे. या गृहप्रकल्पासाठी पीएमआरडीएकडून 728.96 कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली असून, 1,102 कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मे. बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नोलॉजी प्रा. लि. यांच्यामार्फत हे काम केले जात असून, गृहप्रकल्पाच्या आवारातच 83 दुकानांचीही सोय करण्यात आली .

# महापालिकेतील 52 कोटींचा बोगस उपसूचना घोटाळा

## चौकशी अहवाल आयुक्तांकडे सादर; दोषींवर कारवाईची शक्यता वाढली




**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनी बोगस उपसूचनेद्वारे 52 कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे. त्यामध्ये नगरसेवकांसह विभागप्रमुख, अभियंते तसेच, ठेकेदार सहभागी आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पाच सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. त्या समितीने सात दिवसांनंतर अखेर, मंगळवार (दि. 21) चौकशी अहवाल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना सादर केला आहे. समितीने जैन यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस केली की, त्यांना अभय दिले आहे, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

प्रवीण जैन यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्थापत्य, बीआरटीएस व इतर अशी 70 हून अधिक कामांची बिले वेगवेगळ्या 20 ठेकेदारांना 30 मार्चच्या रात्रीत परस्पर अदा केली आहेत. ही बाब महापालिका अधिनियम 1949 मधील अंदाजपत्रकीय नियंत्रण, वित्तीय शिस्त व अधिकृत मंजुरीसंदर्भातील तरतुदीच्या उल्लंघनास कारणीभूत आहे. या प्रकरणाची स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी पुराव्यासह तक्रार केली. त्या घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी डॉ. सूर्यवंशी यांनी पाच सदस्यीय चौकशी समिती 9 एप्रिलला नेमली आहे.

या समितीमध्ये अतिरिक्त आयुक्त (क्रमांक एक) कुलदीप जंगम हे समितीचे अध्यक्ष आहेत. तसेच, अतिरिक्त आयुक्त (क्रमांक दोन) तृप्ती सांडभोर, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे हे समितीचे सदस्य आहेत. चौकशीत दबाव येऊ नये म्हणून आयुक्तांनी दुसऱ्याच दिवशी 10 एप्रिलला प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. समितीने लेखा विभागाकडून आवश्यक कागदपत्रे ताब्यात घेऊन त्यांनी चौकशी केली आहे. चौकशीत प्रवीण जैन यांनी नियमबाह्यपणे काम केल्याचे स्पष्ट झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जैन यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो. आयुक्त जैन यांच्यावर कारवाई करतात. की, त्यांच्या कारनाम्यावर पांघरून घालून त्यांना अभय देतात, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

दरम्यान, महापालिका तिजोरीच्या चाव्या असलेल्या लेखा विभागाकडून आर्थिक घोटाळा झाल्या असल्याने, चौकशी अहवालातून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. त्यामुळे पुढे असे प्रकार घडण्यास चाप बसले, अशी महापालिका वर्तुळात चर्चा आहे.

**आयुक्तांच्या भूमिकेकडे लक्ष**

चौकशी समितीने अहवाल आज आयुक्तांना सादर केला आहे. तो केवळ 52 कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याचा अहवाल असल्याचे सांगितले जात आहे. मागील तीन वर्षांतील घोटाळ्याचा अहवाल तयार करण्यात आणखी वेळ लागणार आहे. 52 कोटींच्या घोटाळ्यात आयुक्त दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई करतात, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. आयुक्तांनी कठोर भूमिका घेतल्यास लेखा विभागासह इतर विभागांना आर्थिक शिस्त लागू शकते. नियमबाह्यपणे काम करण्यास आळा बसेल, असे सांगितले जात आहे.

## पिंपळे गुरवमध्ये बेकायदेशीर पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

मज्जिद-कल्पतरू रोडवर वाहनांची बेजबाबदार उभीकरणे; नागरिकांचा कडक नो-पार्किंगचा आग्रह





**पिंपळे गुरव (दै. संध्या)**

मज्जिद-कल्पतरू रोड परिसरात वाहतूक नियमांचा अक्षरशः बोजवारा उडाला असून, बेकायदेशीर पार्किंगमुळे नागरिक हैराण झाले आहेत. वाहतूक विभागाने अलीकडेच धडक कारवाई करत अनेक वाहनांवर 'जॅमर' लावले; मात्र काही तासांतच परिस्थिती पुन्हा जैसे थे झाल्याचे दिसून येत आहे.

मज्जिदसमोरील मुख्य रस्त्यावर वाहनचालक सर्रासपणे गाड्या उभ्या करत असल्याने रस्त्याची रुंदी कमी होते आणि ये-जा करणाऱ्या वाहनांना मोठा अडथळा निर्माण होतो. त्यातच काही अंतरावर असलेल्या सृष्टी चौक येथील सिग्नलमुळे सकाळी आणि संध्याकाळी लांबच लांब वाहनांच्या रांगा लागतात. या कोंडीत बेकायदेशीर पार्किंग अधिकच भर घालत आहे.

वाहतूक विभागाने यापूर्वीही अनेक वेळा दंडात्मक कारवाई केली आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या कारवाईत काही वाहनांना जॅमर लावून दंड ठोठावण्यात आला. मात्र, वाहनचालकांमध्ये 'दंड भरूनही पुन्हा त्याच ठिकाणी वाहन उभे करण्याची प्रवृत्ती दिसून येत असून कारवाईचा अपेक्षित परिणाम होताना दिसत नाही. प्रशासनाचा प्रभाव कमी झाला आहे का असा प्रश्न आता स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार की पिंपळे गुरवकरांचा प्रवास असाच कोंडीत अडकून राहणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## 'एसटीपी'शेजारी 'बायपास'चा खेळ; सांडपाणी थेट इंद्रायणी-पवना नद्यांमध्ये

**पिंपरी (दै. संध्या)**



शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारून नदी प्रदूषण रोखण्याचा दावा केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात एसटीपीच्या शेजारूनच 'बायपास लाइन'द्वारे न शुद्ध केलेले सांडपाणी थेट इंद्रायणी आणि पवना नद्यांमध्ये सोडले जात असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेले प्रकल्प केवळ कागदोपत्रीच कार्यरत असल्याची टीका होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात विविध ठिकाणी उभारलेले एसटीपी प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालत नसल्याचे वारंवार स्पष्ट झाले आहे. काही ठिकाणी यंत्रणा बंद, तर काही ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक सांडपाणी येत असल्याचे कारण पुढे करून थेट बायपासमार्गे नदीत विसर्ग केला जातो. जलवाहिनी आणि व्हॉल्व्हची रचना पाहता जाणीवपूर्वक बायपासची व्यवस्था केल्याचे दिसून येत आहे.

## पिंपरी शहरात २८ एप्रिलला दुरुस्तीसाठी पाणी राहणार बंद

**पिंपरी (दै. संध्या)**



महापालिकेच्या वतीने निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे मंगळवारी (दि. २८) पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवारी (दि. २९) सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून काटकसरीने वापर करून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से. क्र. २३ येथील तसेच क्षेत्रीय स्तरावरील स्थापत्य व विद्युतविषयक देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये ईव्हींची मागणी वाढली

24 हजारांहून अधिक ईव्ही नोंदणी; चार्जिंग स्टेशनची गरज, खर्च वाढीची शक्यता

**पिंपरी (दै. संध्या)**



इंधनाच्या वाढत्या किंमती, पुरवठ्यातील अनिश्चितता आणि पर्यावरणपूरक पर्यायांची वाढती गरज यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात इलेक्ट्रिक वाहनांची (ईव्ही) मागणी झपाट्याने वाढताना दिसत आहे. शहरात गेल्या काही वर्षात 24 हजारांहून अधिक ईव्हींची नोंदणी झाली असून, विशेषतः दुचाकी ईव्हींचा यात मोठा वाटा आहे. मात्र केंद्र सरकारची सबसिडी बंद होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने नागरिकांमध्ये काहीसे नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

केंद्र सरकारच्या पीएम ई-ड्राईव्ह योजनेंतर्गत ईव्ही दुचाकी आणि तीनचाकींना मिळणारी सबसिडी मार्च 2026 पर्यंत लागू आहे. त्यानंतर ही सबसिडी बंद होण्याची शक्यता आहे. यामुळे ईव्ही दुचाकींच्या किंमतीत किमान 5 हजार रूपयांनी वाढ होण्याची शक्यता; तसेच बॅटरी क्षमतेनुसार 20 ते 40 टकक्कयांपर्यंत वाहनांचूया किंमत वाढण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

ईव्हींच्या वाढत्या वापरामुळे चार्जिंग सुविधांची गरजही वाढत आहे. यासाठी महापालिकेने पुढाकार घेतला आहे असून, महापालिकेने शहरात 22 ठिकाणी नवीन चार्जिंग स्टेशन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. निगडी, भोसरी, पिंपळे सौदागर, मेट्रो स्टेशन आदीसारख्या मुख्यपरिसरात सध्या चार्जिंग सुविधा सुविधा उपलब्ध झाल्यास ईव्ही वाहनांचा वापर आणखी वाढण्याची शक्यता आहे. ईव्हींचा वापर वाढल्याने प्रदूषण कमी होण्यास मदत होते.

# समस्या सोडवण्यासाठी " आयटी स्टडी सेल" स्थापन होणार

## कामगार मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीमध्ये आमदारांच्या पाठपुराव्यामुळे आयटीयन्सना मिळाला दिलासा

**पिंपरी (दै. संध्या)**



हिंजवडी तसेच राज्यातील आयटी पार्कमधील आयटीयन्सच्या नोकरीची असुरक्षितता, 'ले-ऑफ'च्या नावाखाली होणारी पिळवणूक आणि फ्रेशर्सची वाढती फसवणूक यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाकडून एका ' आयटी स्टडी सेल'ची स्थापना केली जाणार आहे. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी या प्रश्नी घेतलेल्या पुढाकारामुळे आता आयटीयन्सचे प्रश्न थेट मुख्यमंत्री स्तरावर पोहोचले असून, लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार आहे.

आयटीयन्सच्या विविध गंभीर समस्यांबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि. २१ ) मंत्रालयात एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी आयटीयन्सया व्यथा मांडल्या. या वेळी कामगार मंत्री फुंडकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, आयटी क्षेत्रासाठी विशेष कायदे करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली आयटी स्टडी सेलची स्थापना करण्याचे निर्देश दिले. या महत्त्वाच्या बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर, प्रधान सचिव (कामगार) आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, अवर सचिव (कामगार-२) स्वप्निल कापडणीस, अवर सचिव (उद्योग) अजित सासुळकर, अवर सचिव (IT) योगेश गोसावी, 'फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज'चे पवनजित माने व प्रशांत पंडित, सहाय्यक कामगार आयुक्त वि. अ. नामदे आणि कक्ष अधिकारी (विधी) अश्विनी सैनी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, राज्याच्या जीडीपीमध्ये आयटी क्षेत्राचा वाटा मोठा असला, तरी येथील आयटीयन्सच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. आयटी कर्मचाऱ्यांची व्याख्या अधिक स्पष्ट करणे, त्यांना औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत संरक्षण मिळवून देणे आणि कंपन्यांकडून केल्या जाणाऱ्या ले-ऑफ थांबवण्यासाठी नियमावली तयार करण्यावर या 'स्टडी सेल'चा भर असेल. तसेच, आयटीयन्सच्या तक्रारींच्या जलद निवारणासाठी 'आयटी ट्रिब्युनल' स्थापन करण्याबाबतही चर्चा झाली.

**बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे**

आयटीयन्सना निवृत्तीनंतरचे वेतन आणि नोकरी गेल्यानंतरचे लाभ मिळावेत यासाठी ईपीएफओ (EPFO) च्या माध्यमातून हस्तक्षेप करण्याचा प्रस्ताव, कंपन्यांमध्ये 'पॉश' (POSH) समिती आणि क्रंची फॅसिलिटी सुविधांची काटेकोर तपासणी, कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून काढून त्यांना 'ब्लॅकलिस्टेड' करण्याच्या प्रकारावर कायदेशीर निर्बंध आणण्याबाबत चर्चा करण्यात आली. मुख्य म्हणजे आयटीयन्सच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी विशेष 'आयटी ट्रिब्युनल' किंवा फास्ट ट्रॅक लेबर कोर्ट येत्या जून अखेर सुरू होण्याबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकण येथे झाडांना लगडल्या कैऱ्या

चाकण (दैनिक संध्या) : चिक्कू व पेरू यांच्याबरोबरच चाकण येथे झाडांना मोठ्या प्रमाणात कैऱ्या लगडल्या आहेत. चाकण शहरात चिक्कू काढण्याचा हंगाम सध्या जोरात सुरू आहे. वटवाघुळ व पक्ष्यांनी चिकूची नासाडी केल्याने चिकू उत्पादक शेतकरी त्रस्त झाला आहे. चिकू बरोबरच परिसरात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांदा आणि कैऱ्यांचे उत्पादन घेतले आहे. गेल्या दोन दिवसांपासून शहरात ढगाळ हवामान असल्यामुळे झाडांना लगडलेल्या कैऱ्या काढण्याची लगबग शेतकऱ्यांनी सुरू केली आहे. रासे, भोसे, शेलपिंपळगाव, वडगाव, नाणेकरवाडी, महाळुंगे, मोई, मेदनकरवाडी, काळुस, वाकी, निघोजे, काळुस आदी भागातील शेतकऱ्यांची कैऱ्या काढण्याची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. येथील शेतकरी शिवाजी धाडगे यांनी सांगितले की," चाकण शहर व परिसरात शेतकऱ्यांनी यंदा मोठ्या प्रमाणात आंबा व कैरीचे उत्पादन घेतले आहे. त्यातून निश्चित नफा होतो. मात्र त्या तुलनेत मेहनत खूप घ्यावी लागते."

### शिरुरमध्ये श्री शंकर महाराज यांच्या 79 व्या समाधी दिनानिमित्त भव्य कार्यक्रम

कवठे येमाई (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील शिरूर (घोडनदी) येथे चैतन्य सद्गुरू योगीराज श्री शंकर महाराज यांच्या ७९ व्या समाधी दिनानिमित्त शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ रोजी भक्तिभावाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून,भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या निमित्ताने सायंकाळी ५ वाजता भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता श्रींच्या पोथी वाचनाचा कार्यक्रम होणार असून, रात्री ८ वाजता श्रींची आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे.हा कार्यक्रम तिळवण तेली समाज मारुती मंदिर, मुंबई बाजार, शिरूर (घोडनदी), जि. पुणे येथे संपन्न होणार आहे. आयोजकांनी सर्व भाविकांनी सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे.या कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन श्री. चैतन्य सद्गुरू श्री शंकर महाराज सेवाभावी प्रतिष्ठान, शिरूर तसेच समस्त भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.समाधी दिनानिमित्त भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पुण्यात 'कार बाजार' घोटाळा; बनावट आरसी, कर्जफसवणुकीने खळबळ

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : जिल्ह्यातील पूर्व हवेली परिसरात 'कार बाजार'च्या नावाखाली सुरू असलेल्या मोठ्या आर्थिक फसवणुकीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. संबंधित 'कार बाजार' चालकाने गाड्या विक्रीसाठी घेतल्यानंतर मूळ मालकांना कोणतीही कल्पना न देता त्यांच्या गाड्यांचे बनावट आरसी बुक, बनावट सह्या आणि कर्जासाठी लागणारी बनावट कागदपत्रे तयार करून त्या गाड्या तिसऱ्या व्यक्तींना विकल्याचे समोर आले आहे. या घोटाळ्यात एकाच गाडीवर दोन वेगवेगळ्या व्यक्तींना 'ईएमआय' भरावा लागत आहे. मूळ मालकाकडे गाडी नसतानाही तो नियमितपणे 'ईएमआय' भरत राहिला, तर बनावट कागदपत्रांवर गाडी खरेदी करणारा ग्राहक देखील 'ईएमआय' भरत होता. मात्र, कर्जातून मिळालेली संपूर्ण रक्कम कार बाजारचालकाने स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचा आरोप आहे. या प्रकारात वित्त कंपन्यांची भूमिकाही संशयास्पद ठरत आहे. बनावट कागदपत्रांवरच कोणतीही सखोल पडताळणी न करता कर्ज मंजूर करण्यात आल्यामुळे हा प्रकार केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून 'कार बाजार'चालक आणि काही वित्त कंपन्यांमधील संगनमताचे मोठे रॅकेट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. दरम्यान, बनावट कागदपत्रांवर गाडी खरेदी करणाऱ्या ग्राहकाचे 'ईएमआय' बाउन्स झाल्यानंतर संबंधित वित्त कंपनीने तीच गाडी जप्त केली. परिणामी, मूळ मालकाकडे ना गाडी उरली, ना पैसे; तरीही त्याच्यावर 'ईएमआय' भरण्याचा तगादा सुरूच आहे. दुसरीकडे, गाडी घेणारा ग्राहकही देखील आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाला आहे. या दुहेरी फटक्यामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कळीत झाली असून, काही पीडितांची मानसिक अवस्था देखील खालावल्याची माहिती समोर येत आहे.



### सिंहगड पायथ्याशी डोंगरफोड व वृक्षतोडीचा आरोप

पुणे (दैनिक संध्या) : पुण्याच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी हवेली तालुक्यातील गोऱ्हे परिसरात मोठ्या प्रमाणात डोंगरफोड, गौणखनिज उत्खनन आणि हजारो वृक्षांची कत्तल सुरू असल्याचे स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींकडून आरोप करण्यात आले आहेत. या घडामोडींमुळे ऐतिहासिक वारसा तसेच पर्यावरणीय संतुलन धोक्यात आल्याची चिंता व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, डोंगरांची नैसर्गिक रचना बदलली जात असून, जैवविविधतेवर त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात. मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्याचा आरोपही समोर आला आहे; ज्यामुळे मातीधूप, जलस्रोतांवर ताण आणि हवामानातील असंतुलन निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या प्रकरणात प्रशासनाच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित विभागांकडून तातडीने आणि ठोस कारवाई दिसून येत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत 'ही निष्क्रियता की जाणीवपूर्वक दुर्लक्ष?' असा सवाल उपस्थित केला जात आहे. पर्यावरण तसेच पुरातत्व विभाग यांच्यावरही टीका होत असून, ऐतिहासिक वारसासंवर्धन आणि पर्यावरणसंरक्षणाच्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडल्या जात नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी 'सिंहगड वाचवा' ही मागणी अधिक तीव्र केली आहे. संबंधित प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी आणि आवश्यक ती तातडीची पावले उचलावीत, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चाकणला महामार्गावर गटारगंगा आली रे अंगणी

## सांडपाणी व कचऱ्यामुळे वाढलाय बकालपणा

चाकण (दै. संध्या)

रस्त्यालगत साचलेले सांडपाणी आणि कचऱ्यामुळे सुटलेली दुर्गंधी यामुळे सेवा अंतर्गत रस्त्यावर गटारगंगा आली रे अंगणी असे चित्र दिसू लागले आहे. चुकीच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलामुळे व वाढत्या कचऱ्यामुळे शहरात बकालपणा वाढत चालला आहे. दिवसेंदिवस चाकण मधील पायाभूत सुविधा अक्षरशः कोलमडत चालल्या आहेत. चाकण शहर व परिसरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. धक्कादायक म्हणजे सेवांतर्गत रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यामुळे स्थानिक रहिवासी, कामगार, उद्योजक, शालेय विद्यार्थ्यांना याचा मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. सांडपाण्यातून सुटलेल्या दुर्गंधीमुळे नागरिक व व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. वाड्या वस्त्यांवर रस्त्याने ये जा करणारे नागरिक कचरा इतरत्र कुठेही फेकत असल्याने जागोजागी वर्दळीच्या ठिकाणी कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात ढिग साचलेले दिसत आहेत. सांडपाणी, कचरा व त्यातून निघणाऱ्या दुर्गंधीमुळे पर्यावरण आणि आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने दुर्गंधीयुक्त पाणी एकाच जाग्यावर तुंबून राहते. तसेच कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा अपुरी आणि कुचकामी ठरत आहे. चाकण शहरात प्रवेश करताना सर्वप्रथम सांडपाणी व कचऱ्याचे मोठमोठे ढिग साचलेले दिसत आहेत. सेवांतर्गत रस्त्यावर सांडपाणी साचल्याने दुचाकी चालक घसरून गंभीर जखमी झाले आहेत.

या भागात सांडपाणी व कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात बकालपणा वाढीस लागला आहे.



### अवैध वीट भट्ट्यांवर कारवाईसाठी छावा क्रांतीवीर सेनेचे उपोषण

नारायणगाव (दै. संध्या)

पिंपळवाडी येथील अवैध वीट भट्ट्यांमुळे निर्माण झालेल्या प्रदूषणाचा प्रश्न आणि बालमजुरीच्या मुद्द्यावरून छावा क्रांतीवीर सेना आक्रमक झाली आहे. येथील ग्रामस्थांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवण्यासाठी आणि दोषींवर कारवाई करण्यासाठी संघटनेचे जिल्हा प्रमुख अविनाश शिंदे व उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष संदीप राऊत यांनी शिर्डी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

पिंपळवाडी परिसरात सुरू असलेल्या वीट भट्ट्यांमुळे प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला असून, भट्ट्यांमधून निघणारा धूर आणि उडणाऱ्या धुळीमुळे श्वसनाचे विकार तसेच डोळ्यांचे आजार वाढले आहेत. या प्रदूषणाचा परिणाम केवळ मानवी आरोग्यावरच नाही, तर शेतकऱ्यांच्या

पिकांवर आणि शेती उत्पादनावरही झाला आहे. या संदर्भात वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने अखेर उपोषणाचे हत्यार उपसावे लागल्याचे अविनाश शिंदे यांनी सांगितले. येथील वीट भट्ट्यांवर मोठ्या प्रमाणावर बालमजूर काम करत असून, एका १५ वर्षीय बालमजुराचा महिन्यापूर्वी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. मात्र, शिर्डी पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केवळ अकस्मात मृत्यू दाखवून थांबवला असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.संबंधित बालमजुराच्या मृत्यूप्रकरणी संबंधितांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा आणि बालमजुरी रोखण्यासाठी तातडीने सर्वेक्षण करून कारवाई करावी, अशी मागणी संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी केली आहे.

ग्रामसभेने यापूर्वीच वीट भट्ट्यांविरोधात ठराव मंजूर केला असूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असा पवित्रा संघटनेने घेतला आहे. शासन स्तरावरून ठोस निर्णय होईपर्यंत हे उपोषण सुरूच राहील, असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

या आंदोलनात संदीप राऊत, संदीप वाघ, अनिल मलदोडे, आकाश गाडे, शुभम शिंदे, आदेश पांगरकर, मंगेश शिंदे, विलास थोरात, जालू बाबा असणे, शाहू रोकडे, अविनाश ससाने, प्रदीप कोते, कुणाल धीवर, विठ्ठल भुजाडे, सुमित सोनवणे, साहिल पठाण, आयान पठाण, अनिल घाडगे, रोहित असणे आणि मच्छिंद्र आळंजकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

### भोपळबुवा व श्री सिद्धेश्वर महाराज यांची यात्रा मोठ्या उत्साहात





राजगुरुनगर (दै. संध्या)

ग्रामीण भागात सध्या यात्रांचा हंगाम सुरू असून अंतिम टप्प्यातील यात्रा मोठ्या गावांमध्ये उत्साहात पार पडत आहेत. तालुक्याचे प्रमुख ठिकाण असलेल्या राजगुरुनगर येथे श्री भोपळबुवा महाराज व श्री सिद्धेश्वर महाराज यांची यात्रा तीन दिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यती, लोकनाट्य तमाशा आणि कुस्ती स्पर्धा ही प्रमुख आकर्षणे ठरली. यात्रेची सुरुवात मांडव डहाळे व शोभायात्रेने करण्यात आली. यात्रेमुळे परिसरात पाळणे, खेळणी व खाद्यपदार्थांच्या दुकानांनी रंगत वाढली होती.

दोन दिवस चाललेल्या बैलगाडा शर्यतीत तब्बल ३५० बैलगाड्यांनी सहभाग घेतला. या शर्यती पाहण्यासाठी शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. विजेत्यांसाठी रोख रक्कम व वस्तुरूप बक्षिसे ठेवण्यात आली होती.

दोन दिवस चाललेल्या बैलगाडा शर्यतीत एकूण ३५० बैलगाडा शर्यतीत सहभाग नोंदविला शर्यतीसाठी आयोजकांकडून क्रमाक्रमाने मोठी रक्कम तसेच वस्तू स्वरूपात बक्षीस ठेवण्यात आली होती.

यावेळी यात्रा कमिटी अध्यक्ष नरेंद्र थिगळे , जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, जिल्हा परिषदेचे गटनेते आणि बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, माजी सभापती विनायक घुमटकर, संचालक अशोक राक्षे, सुधीर भोमाळे, पंचायत समितीचे उपसभापती मंगेश सावंत, राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, राजगुरुनगरचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ व नगरसेवक, रेवणनाथ थिगळे, खंडेराव थिगळे, समीर आहेर, अशोक दुगड,ॲड. संदीप भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

रात्री पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा तमाशा ने नागरिकांचे मनोरंजन केले.अखेरच्या दिवशी येथील मामासाहेब मोहोळ कुस्ती मैदानात कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तालुक्यातील नामांकित कुस्तीपटूच्या या आखाड्यात निमंत्रित कुस्त्या झाल्याने संयोजकांनी तालुक्यातील पैलवानांना एक मोठे व्यासपीठ निर्माण करून दिले. यात्रे निमित्ताने झालेल्या कुस्त्यांच्या आखाड्यात ११० पुरुष आणि१० महिला पैलवान यांनी भाग घेतला.

निकाली कुस्ती जय हनुमान तालीम सोलापूरच्या शाहरुख खान याने पुण्याच्या काका पवार तालीमीतील रामा कांबळे यांच्यावर मात करीत कुस्ती चितपट करून "राजगुरू मानाची गदा" हा 'किताब जिंकला. आखाड्यात विजेत्या पैलवानासाठी एक हजार रुपयांपासून दीड लाखांपर्यंत इनाम ठेवण्यात आले होते.

कुस्ती आखाड्याचे उदघाटन जेष्ठ ग्रामस्थ नानासाहेब टाकळकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख, यात्रा कमिटीचे अध्यक्ष हिरामण सातकर यांच्या हस्ते झाले यावेळी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, नगरसेवक मित्रसेन डोंगरे, फैज मोमीन, वस्ताद मुन्ना शेख, दिलीप मेदगे, संदीप वाडेकर, राहुल पिंगळे, राहुल आढारी, खंडू थिगळे, नरेंद्र थिगळे, गणेश थिगळे,बापू थिटे महाराष्ट्र कुस्ती चॅम्पियन अरुण खेंगले,खेड केसरी शुभम कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कुस्ती पंच म्हणून वस्ताद मुन्ना शेख, योगेश काळे, महेंद्र सातकर, युसूफ शेख, जुनेद शेख,प्रतिकेश सातकर यांनी काम पाहिले. कुस्तीचे सूत्रसंचालन अक्षय मुळुक,प्रकाश घोलप यांनी केले. या कुस्ती आखाड्यात पैलवान रुद्रप्रताप साबळे, मोहित भारती, भूषण सावंत, अभि थिगळे यांनी लक्षणीय डाव करीत कमी कालावधीत कुस्त्या चितपट करून कुस्ती शौकिनांची मने जिंकली. राजगुरुनगर यात्रा कमिटी आणि जय बजरंग तालीम खेड यांनी आखाड्याचे नियोजन केले.

# बेशिस्त वाहनचालकांमुळे पुणे-सोलापूर महामार्ग ठप्प

## डॉ. कल्याण गंगवाल यांचे आवाहन; बैलगाडा शर्यती भरविताना डॉक्टरसह अन्य सुविधा उपलब्ध करण्याची मागणी

लोणी काळभोर (दै. संध्या)

पुणे-सोलापूर महामार्गावर आज मंगळवार दिनांक २१ एप्रिल रोजी संध्याकाळ नंतर वाहतूक कोंडीस हळूहळू सुरुवात झाली .त्यातच उलटया दिशेने जाणाऱ्या बेशिस्त वाहचालकांमुळे पुणे-सोलापूर महामार्ग शेवाळेवाडी पासुन ते उरुळी कांचन पर्यंत जागोजागी ठप्प झाल्याचे दिसून आले. त्यानंतर मात्र नागरिकांचे हाल चालू झाले.

आज लग्नाची तिथ जोरात असल्यामुळे पुणे सोलापूर महामार्गावरील जवळजवळ सर्वच कार्यालयात लग्न असल्यामुळे वाहतुकीवर ताण आला. त्यामध्ये अनेक वाहनचालकांनी मुहूर्त पकडण्यासाठी वाहतूक कोंडीची पर्वा न करता उलटया दिशेने वाहने चालवून वाहतूक कोंडीत भर पाडली. त्यामध्ये शेवाळेवाडी चौक, मांजरी फाटा, टोलनाका व पुढील सर्व चौकात वाहने उलटी येऊ लागली. वाहतूक पोलीस जागोजागी वाहतूक सोडवण्यासाठी प्रयत्न करत होते .परंतु उलट्या दिशेने येणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याने वाहतूक कोंडीत भर पडली.



वाहतूक कोंडी झाल्यानंतर लग्नाला आलेल्या वऱ्हाडी मंडळी वाहतूक पोलिसांच्या मदतीला धावून आली व वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलिसांना मदत झाली. काही नागरिक तर मधुनच वाहतूक कोंडीत स्वतःची झालेली कोंडी बघून माघारी फिरले. तर काही नागरिकांनी लग्नाच्या ठिकाणापासून एक ते दोन किलोमीटर लांब वाहने लावून लग्न कार्यालय गाठले.

इकडे मंगल कार्यालयात मुहूर्ताची वेळ होऊन सुध्दा पाहुणे, मित्र परिवार, तसेच वऱ्हाडी मंडळी न दिसल्याने व संपूर्ण खुर्च्या पूर्णपणे रिकाम्या बघून वर पक्ष व वधु पक्षाची चिंता वाढली. त्यामुळे लग्नाचा मुहूर्ताची आली घटिका म्हणण्याची वेळ एक ते दीड तास पुढे गेली.

भैरोबा नाला ते यवत हा सहापदरी उड्डाणपूल प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पायाभूत समितीने मंजूर केला असून, स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित दादांनी विधानसभेत तशी घोषणा केली होती . यात मेट्रो मार्गाचीही तरतूद आहे.

हा दुमजली उड्डाणपूल भैरोबा नाल्यापासून (हडपसरजवळ) सुरू होऊन यवतपर्यंत जाईल. त्यामुळे हडपसर, लोणी काळभोर, उरुळी कांचन भागातील वाहतूक कोंडी दूर होऊन

पुणे-सोलापूर प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणावर वाचणार आहे. परंतु एक महिन्यात काम सुरु होणार होते. परंतु अजुन पर्यंत काहीच काम सुरू झाले नसल्याने अजित दादांचे स्वप्न कधी पुर्ण होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

बहुचर्चित हडपसर ते यवत पर्यंतच्या या उड्डाणपूलाला अजित दांदाचे नाव देऊन दांदाची स्वप पुर्ण करा अशी मागणी हवेली तालुक्यातील अनेक नागरिकांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

IDFC FIRST Bank

### आयडीएफसी फर्स्ट बँके कडून आईसगेट 2.0 वर कस्टम ड्युटी पेमेंट सुविधा सुरु

मुंबई (दैनिक संध्या) : आयडीएफसी फर्स्ट बँक ने आज आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी विशेष सेवांच्या सुरुवातीची घोषणा केली असून, आईसगेट 2.0 सोबतच्या एकत्रीकरणाद्वारे कस्टम ड्युटी, सेंट्रल एक्साईज आणि सर्व्हिस टॅक्सचे अखंड डिजिटल पेमेंट सक्षम केले आहे. या एकत्रीकरणामुळे ग्राहकांना आईसगेट पोर्टलद्वारे सहजपणे कर भरता येतो आणि आयडीएफसी फर्स्ट बँक च्या रिटेल व कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मद्वारे व्यवहार पूर्ण करता येतात, ज्यामुळे सुरक्षित, कार्यक्षम आणि पूर्णपणे डिजिटल अनुभव मिळतो. या प्लॅटफॉर्मवर रिअल-टाइम व्यवहार पुष्टीकरण, सोपी आणि सुलभ ऑनलाइन प्रक्रिया, तसेच नोंदवही व समायोजनासाठी तत्काळ डाउनलोड करता येणारे चलान उपलब्ध आहे. या लॉन्चबाबत प्रतिक्रिया देताना, आयडीएफसी फर्स्ट बँकेचे रिटेल लायबिलिटीज विभागाचे प्रमुख श्री. आशिष सिंग म्हणाले, “कस्टम ड्युटी पेमेंट्स हे व्यापाराच्या गतीसाठी आणि व्यवसायाच्या सातत्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. आईसगेट 2.0 वर लाइव्ह झाल्यामुळे आम्ही आयातदार, निर्यातदार आणि व्यवसायांना प्रत्यक्ष कर आणि जीएसटीपेमेंटप्रमाणेच सोप्या व विश्वासार्ह पद्धतीने त्यांच्या जबाबदाऱ्या डिजिटल माध्यमातून पूर्ण करण्यास सक्षम करत आहोत. भारताच्या डिजिटल कर आणि व्यापार इकोसिस्टममध्ये आमची भूमिका अधिक बळकट करण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.” आयडीएफसी फर्स्ट बँक ही निवडक खाजगी क्षेत्रातील बँकांपैकी एक असून तिला प्रत्यक्ष कर (सीबीडीटी), जीएसटी आणि कस्टम्स म्हणजेच सीमा शुल्काशी संबंधित कर भरणा सेवांना समर्थन देण्यासाठी अधिकृत मान्यता मिळाली आहे, ज्यामुळे ग्राहकांना आर्थिक आणि वैधानिक अनुपालनासाठी एकच एकात्मिक बँकिंग प्लॅटफॉर्म उपलब्ध होतो. आईसगेट 2.0 पोर्टलमुळे ग्राहकांना आता वर्षभर डिजिटल पद्धतीने पेमेंट करता येते, ज्यामुळे व्यवसायांसाठी प्रभावी कॅश-फ्लो नियोजन आणि सर्व करदात्यांसाठी वेळेवर अनुपालन सुनिश्चित होते.



### IMGC आणि बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेडची भागीदारी

मुंबई (दैनिक संध्या) : भारताची पहिली मॉर्गेज गॅरंटी कंपनी, इंडिया मॉर्गेज गॅरंटी कॉर्पोरेशन (IMGC) ने बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड (BHFL) जी भारतातील सर्वात मोठी ठेव न स्वीकारणारी HFC असून मॉर्गेज उत्पादनांची संपूर्ण श्रेणी उपलब्ध करून देते यांच्याशी धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीचे उद्दिष्ट देशभरातील वंचित वर्ग आणि प्रथमच घर खरेदी करणाऱ्या नागरिकांसाठी गृहकर्जाची जबाबदार उपलब्धता वाढवणे हे आहे. या सहकार्यामुळे IMGC ची पतजोखीम संरक्षणातील तज्ज्ञता आणि BHFL ची मजबूत वितरण व अखेरच्या टप्प्यापर्यंत कर्ज देण्याची क्षमता एकत्र येते. त्यामुळे सीमित पतइतिहास असलेल्या किंवा अनौपचारिक उत्पन्न असलेल्या कर्जदारांना जे आतापर्यंत औपचारिक गृहवित्तापासून वंचित होते त्यांना या सेवेत सामावून घेणे शक्य होईल. भारताच्या परवडणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्रात, विशेषत: स्वयंरोजगारी व्यक्ती आणि अनौपचारिक कामगारांमध्ये, कर्जाची मोठी तफावत कायम आहे. या भागीदारीद्वारे, बजाज हाउसिंग फायनान्स मॉर्गेज गॅरंटी-आधारित समाधानांचा वापर करून गृहकर्जाची उपलब्धता वाढवेल ज्यामध्ये 'संभव लोन' या उत्पादनाचाही समावेश आहे, जे अनौपचारिक उत्पन्न असलेल्या किंवा सीमित पतइतिहास असलेल्या ग्राहकांसाठी विशेषतः तयार केलेले परवडणारे गृहनिर्माण उत्पादन आहे आणि त्याच वेळी जबाबदार कर्जाचे जोखीम अनुशासन देखील टिकवून ठेवेल. या भागीदारीमुळे IMGC ला परवडणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्रात आपला विस्तार करणे, अधिक सर्वसमावेशक गृहवित्त परिसंस्था विकसित करणे आणि संपूर्ण भारतातील गृहकर्जाची मोठी तफावत भरून काढण्यास मदत होईल. या भागीदारीवर बोलताना IMGC चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. महेश मिश्रा म्हणाले: "बजाज हाउसिंग फायनान्ससोबतची ही भागीदारी वंचित घटकांसाठी गृहवित्ताची उपलब्धता वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. मॉर्गेज गॅरंटी कर्जदात्यांना विश्वासाने कर्ज देण्यास आणि त्याचवेळी मजबूत जोखीम अनुशासन राखण्यास सक्षम करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. भारतात मॉर्गेज प्रवेश अद्यापही जागतिक मानकांच्या तुलनेत तुलनेने कमी असल्याने, जबाबदार कर्ज वाढवण्याची संधी मोठी आहे आणि मॉर्गेज गॅरंटीसारखे जोखीम-वाटणीचे उपाय ती जबाबदारीने साकारण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत."

### युनिव्हर्सिटी ऑफ साऊथहॅम्पटनकडून विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण रोजगारक्षम प्रोग्राम

मुंबई (दैनिक संध्या) : भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक नोकरीच्या बाजारपेठेत स्पर्धात्मक बनवण्याच्या उद्देशाने, युनिव्हर्सिटी ऑफ साऊथहॅम्पटन ने 'करिअर ॲडव्हान्टेज' नावाचा एक नाविन्यपूर्ण रोजगारक्षमता कार्यक्रम सुरू केला आहे. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना प्रवेशाची ऑफर स्वीकारल्यानंतर करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि उद्योग क्षेत्राचा अनुभव प्रदान करतो. या उपक्रमांतर्गत, भारतीय विद्यार्थ्यांना अभ्यासापूर्वीची तयारी, साउथहॅम्प्टनमध्ये शिक्षण घेत असताना रोजगारक्षमतेच्या कौशल्यांना चालना आणि पदवीनंतर पाच वर्षांपर्यंत निरंतर करिअर सहाय्य मिळेल. त्यांना विद्यापीठाच्या भारतातील प्रस्थापित करिअर टीम, दिल्ली कॅम्पस नेटवर्क आणि भारतीय कंपन्यांशी असलेल्या संबंधांचाही फायदा होईल. 'करिअर ॲडव्हान्टेज' कार्यक्रम ऑनलाइन सत्रे, उद्योग तज्ञ आणि माजी विद्यार्थ्यांशी संवाद याद्वारे सुरुवातीचे मार्गदर्शन प्रदान करेल. विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर, विद्यार्थ्यांना 'सक्सेसफुल फ्युचर्स' मार्गाद्वारे मार्गदर्शन, कौशल्य-आधारित स्वयंसेवा, जॉब कोचिंग, वेबिनार आणि विशेष सशुल्क इंटर्नशिपच्या संधी मिळतील. याव्यतिरिक्त, विद्यापीठाने सर्व विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य एआय (AI) प्रशिक्षण सुरू केले आहे, ज्यामुळे ते भविष्यातील बदलत्या कार्यशैली, संशोधन आणि तांत्रिक गरजांशी जुळवून घेऊ शकतील. विद्यापीठाचा विश्वास आहे की, हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्वतःला वेगळे सिद्ध करण्यासाठी आणि त्यांच्या कारकिर्दीची दमदार सुरुवात करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, अनुभव, संपर्क जाळे आणि आत्मविश्वास प्रदान करेल. भारतात स्वतःचे कॅम्पस असलेली पहिली जागतिक टॉप १०० युनिव्हर्सिटी असल्याने विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटी ऑफ साऊथहॅम्पटनची भारतातील नामांकित नियोक्त्यांमधील प्रतिष्ठा आणि दिल्ली कॅम्पसशी जोडलेल्या नेटवर्क्सचा मोठा फायदा होईल. युनिव्हर्सिटी ऑफ साऊथहॅम्पटनचे डेप्युटी व्हाइस-प्रेसिडेंट (ऑपरेशन्स) कायरॉन ब्रॉडहेड म्हणाले, “युनिव्हर्सिटी ऑफ साऊथहॅम्पटन जागतिक टॉप १०० विद्यापीठांपैकी एक असून केवळ प्रतिष्ठित पदवी मिळवून देण्यापुरते मर्यादित नाही.

# आरक्षण मिळेपर्यंत लढाई सुरूच राहील : मुख्यमंत्री

## भाजपचा मोर्चा पाहून विरोधकांची झोप उडाल्याशिवाय राहणार नाही

मुंबई (दै. संध्या)




काँग्रेस व त्यांच्या चट्ट्याबट्ट्यांनी कायमच महिला आरक्षणाला आणि त्यांच्या सक्षमीकरणाला विरोध केला. भाजपचा मोर्चा पाहून विरोधकांची झोप उडाल्याशिवाय राहणार नाही. जोपर्यंत विरोधकांच्या नाकावर टिच्चून लोकसभेत आणि विधानसभेत 33 टक्के महिला निवडून देत नाही तोपर्यंत ही लढाई थांबणार नाही, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी व्यक्त केला.

नारीशक्ती वंदन घटना दुरुस्ती विधेयकाविरोधात मतदान केल्याच्या निषेधार्थ मुंबईत भाजपने काढलेल्या जनआक्रोश मोर्चानंतर वरळी येथील समारोपाच्या सभेत फडणवीस बोलत होते. विरोधकांच्या आक्षेपांचा समाचार घेत फडणवीस म्हणाले, महिलांना सक्षम करण्याचा काँग्रेसचा कधीच हेतू नव्हता.

इतिहासात जेव्हा तसे प्रयत्न झाले तेव्हा काँग्रेसने विरोधाचीच भूमिका घेतली. 2023 साली भाजपच्या नेतृत्वातील सरकारकडे दोन तृतीयांश बहुमताचे संख्याबळ होते. विरोध केला तरी भाजपने आणलेला महिला आरक्षणाचा कायदा संमत होणार असल्यानेच काँग्रेसने तेव्हा मन मारून विधेयकाला पाठिंबा दिला.

आता भाजपकडे साधे बहुमत आहे. दोन तृतीयांशचे संख्याबळ नाही. हे माहीत असल्यानेच काँग्रेस व त्यांच्या मित्रपक्षांनी आरक्षण लागू करण्यासाठीच्या घटनादुरुस्ती विधेयकाला विरोध केला.

आरक्षण आताच लागू करा, या विरोधकांच्या भूमिकेवर मुख्यमंत्री म्हणाले, 2023 च्या घटना दुरुस्तीनुसार जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना झाल्यानंतरच आरक्षणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. जनगणनेची प्रक्रिया 2028 पर्यंत पूर्ण होऊ शकते आणि 2032 पर्यंत त्याची पूर्ण अंमलबजावणी शक्य आहे. महिलांना जलद न्याय देण्यासाठी 2011 च्या जनगणनेच्या आधारे ही प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मोदी सरकारने घटनादुरुस्ती विधेयक आणले. तरीही विधेयक पाडण्याचा नालायकपणा विरोधकांनी केला. वरळीतील जांभोरी मैदान ते वरळी डोमपर्यंत काढलेल्या या मोर्चात महिलांचा मोठा सहभाग होता. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सुधीर मुनगंटीवार, मंत्री गिरीश महाजन व आशिष शेलार, भाजप गटनेते आमदार प्रवीण दरेकर, अमित साटम आणि चित्रा वाघ यांच्यासह भाजपचे मंत्री, आमदार, खासदार, नगरसेवक सहभागी झाले.

भाजपच्या या मोर्चामुळे वरळी परिसरात वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे संतप्त झालेल्या एका महिलेने आंदोलनस्थळी थेट मंत्री गिरीश महाजन यांच्यासह उपस्थित पोलिस अधिकाऱ्यांना धारेवर धरले. आंदोलन करायचे असेल तर शेजारच्या मैदानात करा. रस्ता कशाला अडवता, चालते व्हा, अशा शब्दात या महिलेने आपला आक्रोश व्यक्त केला. यासंदर्भातील व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

## मराठमोळा रॅपर रॉक्सनच्या गाण्यांची हिप-हॉपमध्ये क्रेझ

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या हिप-हॉप क्षेत्रात उदयास आलेला तरुण आणि दमदार आवाज म्हणजे रॉकसन. आपल्या प्रभावी गीतलेखन आणि वास्तववादी मांडणीमुळे रॉक्सनने अल्पावधीतच संगीतप्रेमींच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. रॉक्सनला ६२ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांमध्ये नवरदेव बी एस सी ॲग्री या चित्रपटातील “लाल चिखल” या गीतासाठी उत्कृष्ट गीत म्हणून नामांकन मिळालं आहे. त्याने केलेल्या लेटेस्ट फोटोशूटची सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे. २०१७ पासून संगीत आणि रॅपिंग क्षेत्रात सक्रिय असलेल्या रॉक्सनला २०२१ साली प्रदर्शित झालेल्या “गुलाबाच्या फुला” या गाण्यामुळे मोठी ओळख मिळाली. या गाण्याने त्याला महाराष्ट्रात मराठी रॅपर म्हणून एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आणि त्याच्या कारकिर्दीला नवी दिशा मिळाली. रॉक्सनची दिग्गज, रक्कम, महान, सल्तनत अशी अनेक मराठी रॅप गाणी प्रसिद्ध आहेत.

रॉक्सनच्या संगीताची खासियत म्हणजे सामाजिक विषयांवर आधारित आशयपूर्ण मांडणी. युवकांचे प्रश्न, संघर्ष, आणि वास्तव जीवनातील अनुभव यांना तो आपल्या गाण्यांमधून प्रभावीपणे व्यक्त करतो. पारंपरिक मराठी संस्कृती आणि आधुनिक हिप-हॉप शैली यांचा संगम त्याच्या कामामध्ये स्पष्टपणे दिसून येतो. रॅपर रॉक्सन त्याच्या रॅपिंग करिअरविषयी सांगतो, “मी २०१७ पासून संगीत आणि रॅपिंग क्षेत्रात सक्रिय आहे. २०२१ साली प्रदर्शित झालेल्या “गुलाबाच्या फुला” या गाण्यामुळे मोठी ओळख मिळाली. मला ६२ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांमध्ये “लाल चिखल” या गीतासाठी उत्कृष्ट गीत म्हणून नामांकन मिळालं आहे. “लाल चिखल” हे केवळ एक गाणं नसून, समाजाची एक काळी बाजू आहे. काही चुकीच्या प्रथा, यंत्रणा, समाज शेतकऱ्यांची कशी पिळवणूक करतो हे त्या गाण्यात मांडल आहे. शेतकऱ्यांचं खर आयुष्य मी या गाण्यात दर्शवलं आहे. या गाण्याला नामांकन मिळालं यात मला आनंदच आहे परंतु समाजाला आणि यंत्रणांना विनंती आहे की त्यांनी शेतकऱ्यांची बाजू लक्षात घेवून जमेल तशी मदत करावी.”

## शाओमी टीव्ही एस मिनी एलईडी सिरीज भारतात लाँच

### सिनेमॅटिक व्ह्यूईंगमध्ये नवा मापदंड; शाओमीचे भारतातील पहिले मिनी एलईडी टेलिव्हिजन

मुंबई (दै. संध्या)

शाओमी इंडियाने आज भारतात शाओमी टीव्ही एस मिनी एलईडी सिरीजच्या लाँचची घोषणा केली. ही शाओमीची भारतातील पहिली मिनी एलईडी टेलिव्हिजन श्रेणी आहे आणि याद्वारे होम एंटरटेनमेंटच्या अधिक प्रगत व अनुभव-केंद्रित युगात महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

प्रगत मिनी एलईडी तंत्रज्ञानावर आधारित ही सिरीज स्क्रीनवर अधिक कलर डेप्थ आणि स्पष्टता प्रदान करते. यामध्ये अधिक चांगला कॉन्ट्रास्ट, संतुलित ब्राइटनेस आणि अत्यंत तपशीलवार दृश्ये पाहायला मिळतात. यातील रंग अधिक नैसर्गिक दिसतात.

शाओमीचे आतापर्यंतचे सर्वात प्रगत डिस्प्ले इनोव्हेशन असलेल्या क्यूडी मिनी-एलईडी तंत्रज्ञानामुळे १२०० नीट्सच्या पीक ब्राइटनेससह हा डिस्प्ले ब्राइटनेस आणि कॉन्ट्रास्टवर लक्षणीयरित्या अधिक सूक्ष्म नियंत्रण मिळवता येते, जे इतर हाय-एंड डिस्प्ले तंत्रज्ञानाच्या तुलनेत अधिक उत्तम आहे.



प्रगत तंत्रज्ञान व्हिज्युअल अनुभवाला अधिक समृद्ध करण्यासाठी यामध्ये ३४ वॅट क्वाड-स्पीकर सिस्टम देण्यात आली आहे, जी शाओमी साउंडसह ट्यून केलेली आहे. तसेच डॉल्बी ऑडिओ, डीटीएस:एक्स आणि डीटीएस व्हर्च्युअल:एक्समुळे आवाजाचा उत्तम प्रभाव निर्माण होतो, जो अधिक व्यापक आणि मनाला भिडणारा वाटतो. एअरप्ले२, गुगल कास्ट, ड्युअल-बँड वाय-फाय आणि ब्लूटूथच्या सपोर्टमुळे विविध डिवाईसेसवरील कंटेंट कोणत्याही अडथळ्याविना टीव्हीवर पाहता येतो.

मोठ्या डिस्प्लेकडे वळणे आता केवळ एक इच्छा राहिलेली नसून गरज बनत चालली आहे,५५-इंच, ६५-इंच आणि ७५-इंच आकारांमध्ये उपलब्ध असलेली शाओमी टीव्ही एस मिनी एलईडी सिरीज लिव्हिंग रूमची शोभा वाढवण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे.

या लाँचबाबत मत व्यक्त करत शाओमी इंडियाचे चीफ मार्केटिंग ऑफिसर अनुज शर्मा म्हणाले, "स्क्रीनचे आकार वाढत आहेत आणि उच्च-दर्जाच्या कंटेंटची उपलब्धता वाढत आहे, तसतसे पिक्चर क्वालिटीकडून असलेल्या अपेक्षाही वाढत आहेत. आता फक्त स्क्रीनचा आकार वाढवणे पुरेसे नाही, तर त्यामागील डिस्प्ले तंत्रज्ञान देखील तितक्याच वेगाने प्रगत होणे गरजेचे आहे. शाओमी मिनी एलईडी टीव्हीसह आमचे मुलभूत स्तरावर डिस्प्लेची कामगिरी सुधारण्यावर लक्ष केंद्रित आहे. आमचे हे नवीन तंत्रज्ञान बॅकलायटिंगवर अधिक अचूक नियंत्रण मिळवण्यास मदत करते, ज्यामुळे पॅनेलवरील ब्राइटनेस आणि कॉन्ट्रास्टचे व्यवस्थापन अधिक चांगल्या प्रकारे होते. याचा परिणाम म्हणून कॉन्ट्रास्ट, प्रखर हायलाइट्स आणि अधिक सुसंगत पिक्चर क्वालिटी पाहायला मिळते; विशेषतः मोठ्या स्क्रीनवर जिथे चित्राची एकसमानता अत्यंत महत्त्वाची असते."

शाओमी टीव्ही एस मिनी एलईडी सिरीज २२ एप्रिल २०२६ पासून mi.com, आघाडीचे ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध असेल, तसेच प्री-बुकिंग्जना आजपासून सुरूवात होत आहे.

# आसूस तर्फे 'ड्रॉप झोन' नेटवर्कचा २२ स्टोअर्समध्ये विस्तार

## भारतात खरेदीपश्चात सेवा सहाय्य अधिक सुलभ करण्यावर भर

मुंबई (दै. संध्या)

आपल्या 'ड्रॉप झोन' उपक्रमाच्या यशस्वी शुभारंभानंतर आसूस इंडिया ने देशभरातील आपल्या आणखी २२ स्टोअर्समध्ये हा उपक्रम सुरु करत या उपक्रमाच्या विस्तारीकरणाची घोषणा केली आहे. देशभरातील ग्राहकांना खरेदीपश्चात सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवेला पाठबळ देण्याबाबतची आपली वचनबद्धता कंपनीने या उपक्रमातून आणखी मजबूत केली आहे.

ग्राहकांचा उत्पादन वापराचा अनुभव अधिक उंचावण्यावर भर देत 'ड्रॉप झोन' उपक्रम ग्राहकांना त्यांचे लॅपटॉप दुरुस्तीसाठी 'आसस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स'मध्ये जमा करण्याची सुविधा प्रदान करत आहे. यामुळे ग्राहकांना खास सर्व्हिस सेंटर्सवर जाण्याची गरज उरलेली नाही. विशेषतः उदयोन्मुख बाजारपेठांमधील उपलब्धता, दुरुस्तीसाठी लागणारा वेळ आणि सेवेतील स्पष्टता यासारख्या ग्राहकांच्या मुख्य समस्या सोडवण्यासाठीची आससची वचनबद्धता या विस्तारातून प्रकट होते.

दुसऱ्या टप्प्यातील विस्तारांतर्गत 'ड्रॉप झोन'चे जाळे आता दिल्ली एनसीआर, हरियाणा, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, तामिळनाडू, उत्तराखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल यांसारख्या प्रमुख राज्यांमध्ये पसरले आहे. यामुळे मेट्रो शहरांसोबतच द्वितीय आणि तृतीय श्रेणीतील बाजारपेठांमध्येही आससच्या सर्व्हिस जाळ्याची पकड अधिक मजबूत झाली आहे.

ग्राहकांची सोय आणि लवचिकता आणखी वाढवण्यासाठी ग्राहकांच्या विविध गरजा आणि वेळापत्रकांनुसार आससने अनेक सेवा पर्याय उपलब्ध केले आहेत. ग्राहक स्वतः जाऊन प्रत्यक्ष सल्ला घेण्यासाठी 'कॅरी-इन सपोर्ट' वापरू शकतात, तज्ज्ञ तंत्रज्ञांना आपल्या घरी किंवा ऑफिसमध्ये सेवेसाठी आमंत्रित करण्याकरिता 'ऑन-साइट सर्व्हिस' निवडू शकतात किंवा 'ड्रॉप झोन' सेवेचा लाभ घेऊ शकतात. यामुळे नियुक्त 'आसस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स'मध्ये उपकरण जमा करणे आणि परत संकलित करणे त्यांना सोपे सुटसुटीत होणार आहे.

सेवेच्या या विस्ताराबाबत बोलताना, आसूस इंडियाच्या




कंझ्युमर अँड गेमिंग पीसी विभागाचे उपाध्यक्ष श्री. अरनॉल्ड सू म्हणाले, "आससमध्ये आमचा भर नेहमीच केवळ उत्पादन विक्रीवर नसून, खरेदीनंतर ग्राहकांना विश्वसनीय आणि दर्जेदार अनुभव देण्यावर राहिलेला आहे. आमच्या 'ड्रॉप झोन' उपक्रमाचा आम्ही आणखी २२ स्टोअर्समध्ये केलेला विस्तार आमच्या ग्राहकांसाठी खरेदीपश्चात सेवा अधिक सुलभ आणि पारदर्शक बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. आमच्या 'फोअर ए फ्रेमवर्क' च्या मार्गदर्शनांतर्गत, आम्ही तत्पर, सोयीस्कर आणि ग्राहकांच्या बदलत्या गरजांशी सुसंगत अशी सेवा यंत्रणा उभारण्यासाठी वचनबद्ध आहोत."

उत्कृष्ट सेवा आणि जलद पर्याय देण्याच्या आपल्या ध्येयाला अनुसरून, आसूसने भारतातील सर्वात व्यापक असे विक्रीपश्चात सेवा जाळे उभारले आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेल्या २०० हून अधिक सर्व्हिस सेंटर्ससह, १७,००० पेक्षा जास्त गावांत 'ऑन-साइट' सपोर्ट आणि ७६१ जिल्ह्यांमध्ये व्याप्ती असल्यामुळे, कंपनीने देशभरातील ग्राहकांसाठी आपली सेवा आणखी सुलभ केली आहे. या प्रत्यक्ष उपस्थितीसोबतच, आसस कॉल, चॅट, ईमेल आणि रिमोट ट्रबलशूटिंगच्या माध्यमातून २४/७ डिजिटल हेल्पडेस्क सुविधा देखील पुरवते. याव्यतिरिक्त, 'मायआसस' ॲप आणि आससचे अधिकृत 'युट्यूब' चॅनेल यासारखी व्यासपीठे ग्राहकांना त्यांच्या शंकांचे निराकरण कधीही आणि कुठूनही मुक्तपणे करण्यास मदत करतात.

कंपनीचा हा उपक्रम आससच्या '४ए' सेवा चौकटींतर्गत असलेल्या ' आसूस अश्युरन्स इनिशिएटिव्ह'वर आधारित आहे-खात्रीशीर गुणवत्ता, सतत उपलब्ध सहकार्य, सर्वत्र उपलब्ध असलेले सेवा जाळे आणि मूल्यवर्धित सेवा हे चार आधारस्तंभ खरेदीपश्चातच्या सेवा यंत्रणेला मार्गदर्शन करतात

खात्रीशीर गुणवत्ता: ड्रॉप झोन आणि सर्व्हिस सेंटर्समधील प्रमाणित तपासणी आणि दुरुस्ती प्रक्रिया हे सुनिश्चित करतात की, ग्राहकांना प्रत्येक वेळी सातत्यपूर्ण आणि विश्वसनीय सेवा मिळेल.

सतत उपलब्ध सहकार्य : ग्राहकांना कॉल, व्हॉट्सॲप आणि ईमेलसह आससच्या सपोर्ट चॅनेल्सचा २४/७ (दिवस-रात्र) लाभ घेता येत असल्यामुळे त्यांना नेहमी मदत मिळण्याची आणि ती त्यांच्या आवाक्यात असल्याची खात्री मिळते.

सर्वत्र उपलब्ध सेवा जाळेः सेवा केंद्रांचे विस्तारणारे जाळे, १७,००० पेक्षा जास्त गावांत उपलब्ध असलेला 'ऑन-साइट' सपोर्ट आणि आता अधिक शहरांमध्ये सुरू झालेले 'ड्रॉप झोन', यांद्वारे आसस आपली सेवा ग्राहकांच्या घराच्या अधिक जवळ घेऊन आली आहे

मूल्यवर्धित सेवा: 'ड्रॉप झोन' सारखे उपक्रम प्रवासाचा वेळ वाचवून ग्राहकांची सोय वाढवतात. यामुळे दुरुस्तीच्या प्रक्रियेचा मागोवा घेण्यामध्ये पारदर्शकता वाढली असून रिटेल स्टोअर व सर्व्हिस सेंटर यांच्यातील समन्वयामुळे दुरुस्तीचे काम जलद गतीने पूर्ण होते.

दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरू असतानाच, आसस इंडिया आणखी अन्य भांगात 'ड्रॉप झोन'चे जाळे विस्तारणार आहे. विश्वासार्ह 'विक्री-पश्चात' सहाय्य प्रदान करणे आणि सर्व प्रदेशांतील ग्राहकांचे समाधानाची पातळी उंचावणे या आपल्या वचनबद्धतेचा कंपनी या उपक्रनाव्दारे पुनरुच्चार करत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### एक मे महाराष्ट्र दिनी नदीपात्रातील जलपर्णीवर बसून उपोषणचा इशारा

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील मुळा मुठा व इंद्रायणी नदीपात्रातील सोडलेल्या ड्रेनेस केमिकल युक्त पाण्यामुळे हवेली व दौंड तालुक्यातील नदीकाठच्या गावातील शेती व नागरिकांसह पशुधनाचे आरोग्य धोक्यात आले आहे, या पाण्यावर मोठ्या प्रमाणात जलपर्णीची वाढ झाल्यामुळे मच्छरांचा फार मोठा प्रादुर्भाव होत असुन जनजीवन विस्कळीत झाले आहे. दिवसेंदिवस नागरिकांमध्ये आजारी पडण्याचे प्रमाण वाढले असून याचा फार मोठा त्रास नागरिकांसह पशुंना होत आहे. कॅन्सर त्वचारोग यासारखे जीव घेणे आजार बनवण्याची दाट शक्यता असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र वाडेबोल्हाई व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा यासंदर्भात अहवाल असून शासनाने याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. या संदर्भात आमदार बापुसाहेब पठारे व आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी याबाबतीत विधानसभेमध्ये प्रश्न मांडून लक्ष वेधून घेतले तरीही शासनाने त्याकडे लक्ष वेधले आहे. पुणे महापालिका बाणेर येथे ८८१ कोटी रुपये खर्च करुन कॅन्सर रुग्णांसाठी मोठे हॉस्पिटल उभारत आहे या धर्तीवर हवेली दौंड या नदीकाठच्या भागात अशा पद्धतीने हॉस्पिटल उभारणी करुन त्यामध्ये येथील नदीकाठच्या बाधित रुग्णांना मोफत उपचार करुन देण्यात यावे किंवा सध्या शहरातील नामांकित हॉस्पिटल मध्ये नदीकाठच्या नागरिकांवर मोफत उपचार करुन देण्यात यावे. खडकवासला धरणांतून बंदिस्त पाईप लाईन मधून पाणी नदीकाठच्या लोकांना देण्यात यावे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्वच्छ नदी सुधार योजना शहरात राबवली जात असताना इकडे ग्रामीण भागाकडे मात्र या योजनेचा पूर्णपणे फज्जा उडाला आहे नागरिक हवालदिल झाले आहेत. या संदर्भात काही उपाययोजना होत नसल्यामुळे महाराष्ट्र दिनी एक मे रोजी हवेली व दौंड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन जलपर्णीवर बसून उपोषण करण्याचा इशारा शासनाला दिला आहे अशी माहिती माजी सरपंच अंकुश कोतवाल यांनी दिली.



### हरगुडे गावची ग्रामदेवता श्री जानाई देवीचा शुक्रवार-शनिवार यात्रा महोत्सव

सासवड (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील हरगुडे गावची ग्रामदेवता श्री जानाई देवीचा पारंपारिक यात्रा उत्सव वैशाख शुद्ध अष्टमी व नवमी म्हणजेच येत्या २४ व २५ एप्रिलला (शुक्रवार शनिवार) साजरा होत असून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी पहाटे देवीची अभिषेक व महापुजा होऊन यात्रेचा प्रारंभ होईल. सकाळी नऊ ते चार पर्यंत गावातील महिलांचा नवसफेड व सवासिनींचा कार्यक्रम पार पडणार आहे . सायंकाळी चार वाजता देवीला ग्रामस्थांची मानाची साडी चोळी झाल्यावर प्रथेप्रमाणे देवीची काठी वाजत गाजत श्री नृसिंह भेटीला मार्गस्थ होईल. सायंकाळी विविध गावच्या ढोल लेझीम संघाचा छबीना मंदिराच्या पटांगणात पार पडणार आहे. मध्यरात्री उत्सवमूर्ती श्री जानाई देवीची पालखीतून फटाक्यांच्या आतषबाजीत, गुलालाची उधळण करत सवाद्य ग्राम प्रदक्षिणा संपन्न होणार आहे. शुक्रवारी मध्यरात्री निलेशकुमार अहिरेकर सह रुपाली पुणेकर यांचा लोकनाट्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शनिवारी सायंकाळी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा होणार असल्याचे यात्रा समितीच्या वतीने सांगण्यात आले. रविवारी योगेश देशमुख निर्मित युवा लावणी सम्राज्ञी पुनम कुडाळकर यांच्या " तुमच्यासाठी काय पण" हा ऑर्केस्ट्रा सादर होणार आहे. हरगुडे गावच्या यात्रेने तालुक्यातील सर्व गावांच्या यात्रेची सांगता होत असल्याचे सांगण्यात आले.




### मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थिनींची उत्स्फूर्त रॅली

बारामती (दैनिक संध्या) : बारामती विधानसभा पोटनिवडणूक २०२६च्या पार्श्वभूमीवर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वस्तीगृह, सामाजिक न्याय विभाग यांच्या वतीने आज दि. २१ एप्रिल रोजी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील रावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही जनजागृती मोहीम राबविण्यात आली. मतदारांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमाला वस्तीगृह अधीक्षिका सविता खारतोडे, सामाजिक न्याय विभागाच्या दिपाली निवसे तसेच वस्तीगृहातील सर्व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थिनींनी उत्साहाने मतदान जनजागृती रॅली काढत “मतदान करा, हक्क बजावा” अशा घोषणांद्वारे नागरिकांना मतदानासाठी प्रेरित केले. या रॅलीमुळे परिसरात मतदानाबाबत सकारात्मक संदेश पोहोचला असून आगामी निवडणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# सासवडमध्ये रंगणार मानाच्या 'पुरंदर केसरी'चा आखाडा

## महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर यांचा होणार विशेष सन्मान

सासवड (दै. संध्या)

पुरंदर-हवेली तालुक्यातील अत्यंत गाजलेली "पुरंदर केसरी कुस्ती स्पर्धा" यावर्षी मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली आहे. सहकार महर्षी स्व. ना. चंदुकाका जगताप यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि माजी आमदार संजय चंदुकाका जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य स्पर्धा येत्या रविवारी (दि. २६) आणि सोमवारी (दि. २७) एप्रिल २०२६ रोजी सासवड येथील श्री भैरवनाथ कुस्ती स्टेडियमवर पार पडणार आहे. पुणे जिल्हा कुस्तीगीर तालीम संघाच्या मान्यतेने आणि पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था व पुरंदर तालुका कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा संपन्न होणार आहेत.

या स्पर्धेचे मुख्य आकर्षण असलेला 'खुला गट' हा अत्यंत अटीतटीचा ठरणार असून, यातील विजेत्या मल्लास मानाची चांदीची गदा आणि ३५,००० रुपये रोख देऊन 'पुरंदर केसरी' या किताबाने गौरविण्यात येईल. केवळ खुला गटच नव्हे, तर ३० किलो वजनी गटापासून ते ७४ किलोपर्यंत एकूण दहा वेगवेगळ्या गटांमध्ये कुस्त्या रंगणार आहेत. यामुळे लहान वयोगटातील खेळाडूंपासून ते अनुभवी पैलवानांपर्यंत सर्वांना आपली ताकद दाखवण्याची मोठी संधी या आखाड्यात उपलब्ध झाली आहे.

कुस्तीच्या परंपरेचा वारसा जपणारी ही स्पर्धा यंदा अनेक पुरस्कारांनी आणि सन्मानांनी गाजणार आहे. यंदाचा 'डबल महाराष्ट्र केसरी २०२६' चा बहुमान मिळवलेले पैलवान हर्षवर्धन सदगीर यांचा या स्पर्धेच्या निमित्ताने विशेष गौरव केला जाणार आहे. तसेच



कुस्ती क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा 'राज्यस्तरीय आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक केसरी पुरस्कार' यंदा पुण्याचे कामगार केसरी पै. ज्ञानेश्वर मांगडे यांना, तर पुरंदर तालुक्यातील ज्येष्ठ मल्ल पै. शिवाजीराव भिकोबा ताकवले यांना 'मल्हार केसरी' पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

केवळ खेळाडूच नव्हे, तर कुस्तीसाठी उत्तम वातावरण निर्मिती करणाऱ्या गावांसाठीही आयोजकांनी सन्मान सोहळा आयोजित केला आहे. लाल मातीची शान राखत उत्कृष्ट आखाडा नियोजन करणाऱ्या पांगारे (ता. पुरंदर) येथील निष्णाई देवी यात्रा उत्सव कमिटी आणि वडकी (ता. हवेली) येथील श्री काळभैरवनाथ उत्सव समिती यांनाही यावेळी विशेष गौरविण्यात येईल,अशी माहिती कुस्तीगीर संघाचे सचिव रवींद्रपंत जगताप यांनी दिली.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मल्लांसाठी २६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत वजने घेतली जातील. प्रवेश अर्जासोबत दोन आयकार्ड साईज फोटो आणि ओळखीसाठी मूळ कागदपत्रे आधारकार्ड/रेशनिंग कार्ड) असणे बंधनकारक आहे. पुणे जिल्हा कुस्तीगीर तालीम संघाच्या नियमावलीनुसार पार पडणाऱ्या या कुस्तीचा आनंद घेण्यासाठी पुरंदर आणि हवेली तालुक्यातील तमाम नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पुरंदर तालुक्यात टोल नाक्याविरोधात मनसे आंदोलन करणार

जेजुरी (दै. संध्या)

आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर लवकरच टोल वसुली सुरू करण्यात येणार आहे. पुरंदर तालुक्यातील स्थानिक नागरिकांकडून टोल घेवू नये अन्यथा मनसेच्या वतीने आंदोलन करणार असल्याचे इशारा पुरंदर तालुका मनसे अध्यक्ष उमेश जगताप यांनी दिला आहे.

आळंदी पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग विकसित करण्यात आला आहे. या महामार्गासाठी तालुक्यातील अनेक नागरिकांची दुकाने, शेती भूसंपादन करण्यात आली आहे. त्यामुळे येथील भूमिपुत्र टोल सहन करणार नाही. टोल नाक्यापासून तालुक्यातील 20 किलोमीटर अंतरावर असणाऱ्या गावातील नागरिकांना टोल आकारू नये. अशा प्रकारचे फलक टोल नाका परिसरात मनसेच्या वतीने लावण्यात आले आहेत.

स्थानिक नागरिकांकडून टोल आकारणी केल्यास मनसे स्टाईल आंदोलन केले जाईल असा इशारा मनसेचे उमेश जगताप, संभाजी ब्रिगेडचे संदीप जगताप, आण्णाभाऊ साठे सेनेचे यशवंत दोडके, सामाजिक कार्यकर्ते शिवराज झगडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे रमेश लेंडे यांनी दिला आहे.

लवकर तालुकास्तरावर या टोल विरोधात आंदोलन करण्यात येणार असल्याचे संदीप जगताप यांनी सांगितले.

## खा. कोल्हें महात्मा फुलेंच्या जयंतीनिमित्त उच्चस्तरीय समितीवर

कोरेगावमुळ (दै. संध्या)

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त भारत सरकार देशव्यापी स्मरणोत्सव साजरा करणार असून या कार्यक्रमास मार्गदर्शन आणि देखरेख करण्यासाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. फुले दाम्पत्याचा अभिमानास्पद इतिहास सांगणारी 'मी सावित्रीबाई फुले' ही डॉ. कोल्हे यांची मालिका सध्या स्टार प्रवाह वाहिनीवर सुरू आहे.

या मालिकेचे १०० भाग नुकतेच पूर्ण झाले आहेत. अशातच भारत सरकारने देशव्यापी स्मरणोत्सव समितीवर सदस्य म्हणून खासदार डॉ. कोल्हे यांची नियुक्ती करणे हा



विलक्षण योगायोग जुळून आला आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने ११ मार्च २०२६ रोजी काढलेली अधिसूचना १३ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली १२६ सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून त्यात खासदार डॉ. कोल्हे यांचा समावेश करण्यात आला आहे. महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त ११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२८ या दोन वर्षांच्या कालावधीत हा देशव्यापी स्मरणोत्सव साजरा करण्यात येणार असून भारतातील या महान समाजसुधारकाला केवळ अभिवादन नसून त्यांच्या सामाजिक न्याय, समानता आणि सशक्तीकरणाच्या चिरंतन विचारांना पुन्हा दृढ करण्याची संधी असल्याची भावना भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाने व्यक्त केली आहे. फुले दाम्पत्याचा अभिमानास्पद इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी डॉ. अमोल कोल्हे यांनी निर्मिती केलेल्या 'मी सावित्रीबाई फुले' ही मालिका सुरू असतानाच भारत सरकारने त्यांना देशव्यापी स्मरणोत्सव उच्चस्तरीय समितीवर नियुक्ती केल्याने त्यांना हा इतिहास प्रखरतेने मांडण्यासाठी बळ मिळणार आहे.

या संदर्भात खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले की, महात्मा फुले २०० व्या जयंतीनिमित्त होणाऱ्या देशव्यापी स्मरणोत्सवाच्या उच्चस्तरीय समितीवर माझी नियुक्ती होणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान असून महात्मा फुले यांचा विचार तरुण पिढीत रुजविण्याचा आमचा प्रयत्न सफल होण्यासाठी या समिती सदस्यत्वाचा उपयोग होईल, असे खासदार डॉ. कोल्हे यांनी सांगितले.

महात्मा फुलेंच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील समितीवर डॉ. अमोल कोल्हे यांची निवड. महात्मा फुलेंचे कार्य राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींची अमोल कोल्हेंवर मोठी जबाबदारी. 126 सदस्यीय राष्ट्रीय समितीत महाराष्ट्रातून खा. डॉ. अमोल कोल्हेंना मानाचे स्थान.

## विधानसभा पोटनिवडणुकीसाठी प्रशासन सज्ज-उत्तम दिघे

बारामती (दै. संध्या)

बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून या पार्श्वभूमीवर प्रशासनाने निवडणूक प्रक्रियेसाठी सर्वंकष तयारी पूर्ण केली असून मतदान सुरळीत, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली आहे.

पोटनिवडणुकीसाठी मतदान यंत्रे (ईव्हीएम), व्हीव्हीपॅट, प्रशिक्षित निवडणूक कर्मचारी तसेच पोलिस बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची सोय, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा तसेच विविध तपासणी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करून निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ८४ हजार ५७९ मतदार असून, त्यामध्ये १ लाख ९३ हजार ८७१ पुरुष, १ लाख ९० हजार ६८४ महिला आणि २४ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. या मतदारांसाठी ४७८ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याकरिता ४७८ ईव्हीएम, ९५६ बॅलेट युनिट्स आणि ४७८ व्हीव्हीपॅट यंत्रे मतदान केंद्रांवर पाठवण्यात येणार आहेत. याशिवाय ६० ईव्हीएम व व्हीव्हीपॅट आणि १२० बॅलेट युनिट्स राखीव आहेत.

निवडणूक कामकाजासाठी १६५ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी ६० वाहने, ईव्हीएम मशीन व साहित्य वाहतुकीसाठी ६० बंदिस्त मिनी टेम्पो आणि कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी ४५ बसेसचा समावेश आहे. मतदान केंद्रांवर मतदारांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वैद्यकीय संच, तसेच मंडप आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माध्यम प्रतिनिधींना मतदारसंघात वृत्तांकन प्रवेशिका देण्यात आल्या आहेत. निवडणुकीदरम्यान आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करण्यासाठी ८ तपासणी नाके (चेकपोस्ट) उभारण्यात आले असून, त्यासाठी १६ स्थिर पथके आणि ८ फ्लाइंग स्क्वॉड कार्यरत आहेत.

## गुणवत्ता संवर्धन अभियानात सुरेशभाऊ गोरे विद्यालयाचा दुसरा क्रमांक

चाकण (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मध्ये घेण्यात आलेल्या गुणवत्ता संवर्धन अभियानात येथील स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालयाचा दुसरा क्रमांक आला असल्याची माहिती विद्यालयाच्या प्राचार्या प्रमिला गोरे व संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांनी दिली.

स्व.आ. सुरेशभाऊ गोरे या विद्यालयाचा शहर व तालुकास्तरावर गट क - इयत्ता आठवी ते इयत्ता बारावी या गटात दुसरा क्रमांक आला. गोरे विद्यालयाच्या या उत्तुंग यशाबद्दल चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, नगरसेवक मंगेश कांडगे, रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी, हर्षद लेंडघर आदींनी कौतुक केले.

# सासवड नगरपरिषदेकडून दिव्यांगांसाठी ५% निधी

## नगराध्यक्षा आनंदीकाकी चंदूकाका जगताप यांच्या हस्ते धनादेश वाटप

पुणे (दै. संध्या)

सासवड नगरपरिषदेकडून २०२५-२६ या आर्थिक वर्षात दिव्यांग कल्याणासाठी राखीव ठेवलेल्या ५ टक्के निधीचे वितरण करण्यात आले असून, एकूण १९६ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे २२ लाख ७७ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. नगराध्यक्षा आनंदीकाकी चंदूकाका जगताप यांच्या हस्ते नगरपरिषद कार्यालयात आयोजित कार्यक्रमात लाभार्थ्यांना प्रतीकात्मक धनादेश वाटप करण्यात आले.



सासवड नगरपरिषदेकडून दरवर्षीप्रमाणे यंदाही दिव्यांग नागरिकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला होता. या निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्यासाठी करण्यात आला. त्यामुळे लाभार्थ्यांना आर्थिक मदत वेळेत आणि सुरक्षितरित्या मिळाली आहे.

नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या अर्जांच्या छाननीनंतर एकूण १९६ पात्र दिव्यांग नागरिकांची निवड करण्यात आली. प्रत्येक लाभार्थ्याला सुमारे ११ हजार ७२४ रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. या संदर्भात नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता.

दि. २० एप्रिल २०२६ रोजी सासवड नगरपरिषद कार्यालयात आयोजित कार्यक्रमात शहरातील लाभार्थ्यांना धनादेशांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिक उपस्थित होते. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, नगरपरिषदेचे सदस्य तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी दिव्यांग नागरिकांसाठी अशा योजनांचे महत्त्व अधोरेखित केले.

या उपक्रमामुळे दिव्यांग नागरिकांना आर्थिक आधार मिळाल्याने त्यांनी नगरपरिषदेचे आभार व्यक्त केले. भविष्यातही अशाच योजना राबवून अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दिव्यांग नागरिकांचे सक्षमीकरण आणि त्यांना आर्थिक बळ देणे हे नगरपरिषदेचे कर्तव्य आहे. अशा योजना पुढेही सातत्याने राबविण्यात येतील," असे नगराध्यक्षा आनंदीकाकी चंदूकाका जगताप यांनी सांगितले.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला. सासवड नगरपरिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपली जात असून, शहरातील दिव्यांग नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

सासवड नगरपरिषद कार्यालयात दिव्यांग लाभार्थ्यांना ५% निधीअंतर्गत प्रतीकात्मक धनादेश वाटप प्रसंगी नगराध्यक्षा आनंदीकाकी चंदूकाका जगताप यांच्यासमवेत गटनेते अजित जगताप, आरोग्य सभापती राजन जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, बांधकाम सभापती माऊली जगताप, माजी उपनगराध्यक्ष यशवंत काका जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत व दिव्यांग बांधव उपस्थित.